दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

www.epaper.rajyaloktantra.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–३२० | शुक्रवार, दि.१४ मार्च २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

धुलिवंदनाच्या सर्वांना... हार्दिक शुभेच्छा!

–संपादक

# बाजार समितीच्या नियमांमध्ये लवकरच सुधारणा

## पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली माहिती

मुंबई । प्रतिनिधी

कृषी उत्पन्न बाजार समितीवर असलेल्या विश्वासापोटी शेतकरी आपला शेतमाल बाजार समितीच्या परवानाधारक व्यापाऱ्यांना विक्री करीत असतो. शेतकरी हिताच्या दृष्टीने काळानुरूप बाजार समितीच्या नियमांमध्ये किंवा धोरणामध्ये सुधारणा करण्यासाठी अपर मुख्य सचिव यांच्या माध्यमातून काम सुरू आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नियमांमध्ये शेतकरी हिताच्या दृष्टीने शासन निश्चितच सुधारणा करेल, असे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी विधानसभेत लक्षवेधीच्या उत्तरात सांगितले.





छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर येथे व्यापाऱ्याने शेतकऱ्यांचे कांद्याचे पैसे न दिल्याबाबत सदस्य रमेश बोरनारे यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या सूचनेच्या उत्तरात मंत्री रावल म्हणाले, कृषी उत्पन्न बाजार समितीने परवाना दिलेले व्यापारी हे शेतकऱ्यांचा शेतमाल खरेदी करतात. शेतकरी मोठ्या विश्वासाने या व्यापाऱ्यांना आपला शेती माल विक्री करतात. अशा व्यापारामध्ये कुठेही शेतकऱ्याचे नुकसान होऊ दिले जाणार नाही. शेतकऱ्यांनी विकलेल्या शेतमालाचा मोबदला कायद्यानुसार त्याच दिवशी किंवा किमान पुढील सात दिवसाच्या आत देणे गरजेचे आहे.

वैजापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांचा मोबदला देण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीने संबंधित व्यापाऱ्याची मालमत्ता व बँक हमी जप्त केली आहे. या बँक हमी आणि मालमत्तेच्या लिलावातून ३१ लाख रुपये हे कांदा विक्री केलेल्या ११८ शेतकऱ्यांना मोबदला देण्यात आला आहे. ◀◀ पान २ वर

# राज्यात उष्णतेचा कहर !

## अनेक शहरांचे तापमान ४० अंशाच्या वर



पुणे । प्रतिनिधी

यंदा राज्यात अधिक तापमान राहणार असल्याचा अंदाज वर्तविला जात आहे. यातच येत्या काही दिवसात उष्णतेची लाट राहणार असल्याचा अंदाज देखील वर्तविण्यात आला आहे. याची चाहूल लागण्यास सुरवात झाली असून सध्या राज्यातील अनेक शहरांमधील तापमान हे ४० अंशाच्या ◀◀ पान २ वर

# खोक्याचा गेम ओव्हर, घरावर बुलडोझर

## शुक्रवारी न्यायालयासमोर हजर करणार; बरेच गुन्हे उघड होणार

बीड । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून खोक्या उर्फ सतीश भोसले हा चांगलाच चर्चेत आला आहे. शिरूरमध्ये ढाकणे कुटुंबातील वडील आणि मुलाला मारहाण, बुलढाणा येथील कामगाराला अमानुष मारहाणीचे व्हिडिओ व्हायरल झाल्यावर पोलिस प्रशासन जागे झाले. त्याला प्रयागराज येथून अटक केल्यावर त्यास बीड येथे आणून शुक्रवारी न्यायालयासमोर हजर केले जाणार असल्याचे समजते. तसेच खोक्याचा गेम ओव्हर झाला असून वनविभागाने त्याच्या घरावर बुलडोझर फिरवले आहे. खोक्याला बीडला आणल्यावर बऱ्याच गुन्ह्यांची उकल होण्याची शक्यता असल्याचे म्हटले जात आहे.



मारहाणीच्या व्हायरल व्हिडिओमुळे खोक्याचे सर्व कारनामे उघड झाले. शिरुर पोलिसात खोक्या विरोधात तीन गुन्हे दाखल झाले असून वन विभागाकडूनही दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. खोक्याने एका वृत्तवाहिनीला मुलाखत दिल्यावर बीड पोलिस ॲक्शन मोडवर आली. पोलिसांनी उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथून खोक्याच्या मुसक्या अवळल्या. त्यानंतर त्याला विमानाने आणण्यात आले असून बायरोड बीडमध्ये त्याला आणले. तर काही ◀◀ पान २ वर



### खोक्या, बोक्या, ठोक्या, सगळ्यांना ठोकणार–फडणवीस



खोक्या, बोक्या, ठोक्या कोणीही असो, कोणालाही सोडणार नाही. सगळ्यांना ठोकणार असल्याचा कडक इशारा उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे.

### 'त्या' पिशवीमुळे प्रकरणात मोठा ट्विस्ट

खोक्याच्या घरावर वनविभागाकडून बुलडोझर चालवण्यात आला आहे, दरम्यान खोक्याचे घर पाडण्यापूर्वी त्यातील सामान एका ट्रॅक्टरमध्ये ठेवण्यात आले. मात्र खोक्याच्या घरातील सामान बाहेर काढत असताना त्याच्या घरामध्ये वनविभागाला एका पिशवी देखील आढळून आली आहे. वनविभागाने त्याच्या घरातील इतर सामान ट्रॅक्टरमध्ये ठेवले, मात्र ती पिशवी वेगळी ठेवण्यात आली आहे. या पिशवीमुळे आता या प्रकरणातील गूढ आणखी वाढले आहे. या पिशवीमध्ये नेमकं काय आहे? हे अद्याप समोर येऊ शकले नाही. मात्र या पिशवीत काही तरी महत्त्वाची गोष्ट असावी असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

### हरणांचे मांस कोणी कोणी खाल्ले?

खोक्याने २०० पेक्षा जास्त हरणांची शिकार करुन त्यांचे मांस खाल्ले असल्याची चर्चा असली तरी हरणांचे मांस खोक्या व त्याच्या सहकाऱ्यांनीच खाल्ले असल्याचे म्हटले जात आहे. तसेच हरणांचे मास खोक्याने इतर कोणा कोणाला दिले आणि ते कोणी कोणी खाल्ले याचा सुध्दा शोध घेण्याचे आव्हान पोलिस आणि वनविभागासमोर आहे. त्या दिशेने शोध घेण्यात आला तरच हरणाच्या शिकारी मागे नेमके कोण कोण आहेत? हे उघड होईल, असे म्हटले जात आहे.

### आतापर्यंत वनविभागाकडून डोळेझाक का?

एवढ्या वर्षात वनविभागाने खोक्याला अभय दिले होते का? की जाणिवपूर्वक डोळेझाक केली हा प्रश्न निर्माण होत आहे. खोक्याचे एवढे कारनामे समोर येऊनही अद्याप त्याच्या ग्लास हाऊसवर कारवाई करण्यात आलेली नव्हती. शेवटी त्याचे व्हिडिओ बाहेर आल्याने त्याच्यावर गुन्हे दाखल झाले आणि वनविभाग जागे झाले. त्यामुळे कुठे तरी वनविभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या भुमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

# आ.सुरेश धसांच्या गावात मजूराचा खून

## मित्रानेच काढला काटा; जागेश्वरी पारगाव शिवारात सापडला मृतदेह

आष्टी । प्रतिनिधी

आ. सुरेश धस यांचे जन्मगाव जामगाव येथे एका मजुराचा मित्रानेच अवघ्या ३० हजारासाठी खून केल्याची घटना समोर आली आहे. जोगेश्वरी पारगाव शिवारात मयत मजूराचा मृतदेह सापडला असून याप्रकरणी दोघांवर खुनाचा गुन्हा दाखल झाला आहे.

गेल्या तीन महिन्यापासून बीड जिल्हा हा कोणत्या ना कोणत्या कारणामुळे सतत चर्चेत आहे. कधी खून तर कधी मारहाणीचे व्हिडिओ व्हायरल झाल्याने राज्याचे लक्ष बीडकडे राहिले आहे. आ. सुरेश धस यांचे जन्मगाव जामगाव येथील एका मजुराचा त्याच्याच मित्राने ३० हजारामुळे खून केल्याची घटना उघडकिस आली आहे धनंजय रणसिंग (वय–५०, रा. जामगाव, ता. आष्टी) असे मयताचे नाव आहे. जामगाव येथील समिर अकबर शेख आणि जोगेश्वरी पारगाव येथील अर्शद कमरुद्दीन शेख यांनी धनंजय रणसिंग याचा खून केला व त्याचा मृतदेह आष्टी–खडकत रोड लगत जोगेश्वरी पारगाव शिवारात टाकला. दि. १० मार्च रोजी रात्री ८.३० ते दि. १२ मार्च रोजी या दरम्यान हा खून करण्यात आल्याचे म्हटले जात आहे. या प्रकरणी आष्टी पोलिसात समिर अकबर शेख आणि अर्शद कमरुद्दीन शेख यांच्याविरोधात खूनाचा गुन्हा नोंद झाला आहे.

### सुटीची सुचना

आज शुक्रवार, दि.१४ मार्च २०२५ रोजी धुलिवंदननिमित्त दै. राज्य लोकतंत्र कार्यालयास सुटी असल्यामुळे उद्या शनिवार दि.१५ मार्च २०२५ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही, याची वाचक, जाहिरातदार, एजंट यांनी नोंद घ्यावी.

–व्यवस्थापक

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१२ मार्च २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ११७.५० क्विंटल | २,५४० | २,९२६ | २,६३३ |
| ज्वारी/हायब्रिड :१७१.५० क्विंटल | १,८०० | ३,७०० | २,३३० |
| मका/लोकल:२०.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : १२.५० क्विंटल | ६,७०० | ६,९५० | ६,८२६ |
| उडीद : ७.५० क्विंटल | ५,१०० | ५,१०० | ५,१०० |
| बाजरी: ३९.०० क्विंटल | २,५०० | ३,१०० | २,८७७ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: १०८.५० क्विंटल | ३,९२५ | ४,०११ | ३,९७२ |
| हरभरा: २९.५० क्विंटल | ५,१०० | ५,१५० | ५,१२३ |

# धनंजय देशमुखांचा साडू पोलिसांना सरेंडर

## गुन्हा दाखल होताच दादा खिंडकर ताळ्यावर



बीड । प्रतिनिधी

तरुणाला केलेली मारहाण आणि घरावरील हल्ला याचे व्हिडिओ व्हायरल झाल्यावर धनंजय देशमुख यांचे साडू दादा खिंडकर याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर तो ताळ्यावर आला असून पोलिस अधिक्षक कार्यालयात जावून तो पोलिसांना शरण आला.

दादा खिंडकरचा मारहाण करतानाचा ◀◀ पान २ वर

# वाल्मिक कराडपेक्षाही दादा खिंडकर मोठा गुन्हेगार

## तीन गावे दहशतीमध्ये; ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांचा आरोप



### "दादा खिंडकरवर मकोकाअंतर्गत कारवाई करा

दादा खिंडकर याच्यावर घरफोडी जीवे मारण्याचा प्रयत्न करणे, असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्याच्या दहशतीखाली ग्रामपंचायत अंतर्गत तीन गावे आहेत. तो वाल्मीक कराड पेक्षाही मोठा गुन्हेगार आहे. त्यामुळे त्याच्यावर मकोका अंतर्गत कारवाई करून अटक करावी, अशी मागणी सातपुते यांनी केली आहे.

बीड । प्रतिनिधी

धनंजय देशमुख यांचा साडू दादा खिंडकर याने तरुणाला अमानुष मारहाण केल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्याने एकच खळबळ उडाली. त्याच्यावर दोन गुन्हे दाखल झाल्यावर तो पोलिसांना शरण आला. दरम्यान दादा खिंडकर विषयी ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी मोठे विधान केले आहे. दादा खिंडकर हा वाल्मिक कराडपेक्षाही मोठा गुन्हेगार आहे, त्याच्या दहशतीखाली तीन गावे असून त्याच्यावर अनेक गंभीर गुन्हे दाखल असल्याचे सातपुते यांनी ◀◀ पान २ वर

## राज्यात अतिक्रमणावर हातोडा चालू असताना केजमध्ये अडचण काय?

# शासकीय जागा अतिक्रमण धारकांचा बनलाय अड्डा!

● कानडी रोड, केज–बीड रोड, तहसील समोर, पंचायत समिती समोर, केज–कळंब रस्ता मोकळा श्वास कधी घेणार?

दुर्गादास लांब । केज

सध्या राज्यामध्ये सर्व ठिकाणी अतिक्रम काढण्याची मोहीम चालू असल्याचे पाहायला मिळत आहे तसेच बीड शहरातही प्रशासनाने अनेक दिवसापासून अतिक्रम काढण्याचे काम सुरू केले आहे मात्र केज शहरांमध्ये केज बीड रोड, तहसील कार्यालय परिसर, कानडी रोड, कळंब केज, रोड बस स्टँड परिसर, अशा अनेक ठिकाणी अतिक्रमण झाल्याचे पाहायला मिळत आहे मात्र हे अतिक्रमण कधी काढणार असा सवाल आता सर्व सामान्य नागरिकांतून केला जात आहे हे अतिक्रमण काढण्यासाठी केज विधानसभेचे लोकप्रतिनिधी पुढाकार घेतील का किंवा प्रशासनाला तशा सूचना देऊन अतिक्रमण काढायला सांगतील का याकडे जातात सर्वांचं लक्ष लागलं आहे.

केज शहरांमध्ये अनेक ठिकाणी शासकीय जागेमध्ये अतिक्रमण केल्याचं बघायला मिळत आहे काही दिवसापूर्वी सर्व जागेवरील अतिक्रमण काढलं होतं मात्र परत अजून जशास तसे चित्र पाहायला मिळत आहे काही ठिकाणी तर अक्षरशा सिमेंट रस्त्यावरती पानटपरी गाडी लावून रस्ता वाहतुकीला अडचण करत आहे याकडे प्रशासन व नगरपंचायत यांनी लक्ष देऊन ◀◀ पान २ वर



सध्या रमजान ईदचा महिना चालू असल्यामुळे काही फळ विक्रेते हे रस्त्यावर बसलेले असतात मात्र हा रमजानचा महिना संपल्यानंतर सर्व शासकीय जागेवरील अतिक्रमण काढण्यासाठी आम्ही सूचना करणार आहोत सूचना करूनही जर अतिक्रमण धारकांनी अतिक्रमण नाही काढल्यास आम्ही प्रशासनाच्या मदतीने अतिक्रमण काढण्यास सुरुवात करणार आहोत

–हरुण इनामदार, गटनेते नगरपंचायत, केज

तहसीलदार यांच्यासोबत शहरातील अतिक्रमण संदर्भात चर्चा झालेली आहे येत्या काही दिवसात कोणकोणत्या जागेवर अतिक्रमण केलेलं आहे याचा सर्वे करून त्यांना नोटीस देऊन नगरपंचायत, तहसीलदार व पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त सहकार्याने कार्यवाही करणार आहोत.

–अजित ढोपे, सी.ओ. नगरपंचायत केज

## अग्रलेख

# लोकशाहीच्या मंदिरात अशोभणीय वर्तन

सध्या सुरू असलेल्या संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या निमित्ताने संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये जो विनाकारण गदारोळ सुरू आहे आणि असंसदीय भाषा वापरली जात आहे ती पाहता देशातील कोट्यवधी मतदारांनी आपला प्रतिनिधी म्हणून ज्या नेत्यांना संसदेत पाठवले आहे त्यांना या पवित्र ठिकाणी कसे बोलायचे याचेही भान नाही असेच दिसून येते. केवळ काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मल्लिकार्जुन खर्गे यांच्या एका विधानामुळे आणि त्यांनी त्यानंतर मागितलेल्या माफीमुळे हा विषय सुरू झाला आहे असे नाही, तर सर्वपक्षीय प्रतिनिधीच अनेक वेळा भान विसरून वाटेल ती विधाने संसदेच्या पवित्र व्यासपीठावर करत आहेत, असे आजवर अनेक वेळा सिद्ध झाले आहे.

सत्ताधारी बाकावर बसणारे मंत्री किंवा खासदार असोत किंवा विरोधी बाकावर बसणारे विरोधी पक्षनेते आणि खासदार असोत त्यांनी एखादे आक्षेपार्ह विधान केल्यानंतर ते कामकाजाचा भाग न मानता कामकाजाच्या रेकॉर्डमधून काढून टाकले म्हणून किंवा नंतर संबंधित प्रतिनिधीने माफी मागितली म्हणून हा विषय संपवून टाकावा का हा सुद्धा विषय या निमित्ताने समोर आणावा लागणार आहे. मुळात तामिळनाडू राज्य सरकार केंद्र सरकारच्या शैक्षणिक धोरणातील त्रिभाषा सूत्र स्वीकारायला तयार नसल्याने केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या भाषणामध्ये तामिळनाडूतील जनतेचा उल्लेख 'असंस्कृत आणि अशिक्षित' या शब्दांत केला होता तेसुद्धा असंसदीय मानावे लागते. याच मुद्द्याला उत्तर देताना मल्लिकार्जुन खर्गे यांनी सरकारला अडचणीत आणण्याचा इशारा देताना 'ठोकेंगे' या शब्दाचा वापर केल्यामुळे जास्तच गोंधळ निर्माण झाला. संसदेच्या कामकाजातून हा शब्द वगळण्यात आला आणि मल्लिकार्जुन खर्गे यांनी लगेच माफी मागून या विषयाला पूर्णविराम देण्याचा प्रयत्नही केला. पण दुसरीकडे तृणमूलच्या एका खासदाराने एका चर्चेच्या निमित्ताने चर्चेला उत्तर देत असलेल्या मंत्र्याला तुम्हाला मंत्री कोणी केले, अशा प्रकारचा प्रश्न विचारून नवीन वादाला तोंड फोडले. खरे तर दीर्घकाळ संसदेतील कोणत्याही सभागृहाचे प्रतिनिधित्व करणारे राजकीय नेते असो वा पहिल्यांदाच निवडून येणारे खासदार असो त्यांनी संसदेत कसे वागावे, कोणत्या शब्दांचा वापर करावा याबाबत एक प्रशिक्षण नेहमीच दिले जाते.

गेल्या काही वर्षांच्या कालावधीमध्ये संसदेत काम करण्यापेक्षा गोंधळ घालणे आणि आरडाओरडा करून सरकारला अडचणीत आणणे यालाच प्राधान्य दिले जात असल्याने असंसदीय भाषेचा आणि असंसदीय व्यवहाराचा वापर चालू असेल तर त्यात आश्चर्य काही नाही. मोदी सरकारने दोन वर्षांपूर्वी असंसदीय शब्दांची यादी जाहीर केली होती. अशा प्रकारची यादी जाहीर करणे ही १९५४ पासूनची पद्धत आहे. आजपर्यंत कोणते शब्द कामकाजातून वगळण्यात आले आहेत त्याची ती खरे तर यादी आहे. हे शब्द जर कामकाजात वापरण्यात आले तर ते काढून टाकण्यात येतील हे दर्शवण्यासाठी अशा शब्दांची यादी नेहमी जाहीर केली जाते. ही यादी पूर्णपणे तांत्रिक असते आणि अनेक वेळा ही यादी करताना फारसा विचारही केला जात नाही. आजपर्यंत कोणते शब्द काढून टाकले होते त्याची ती यादी असते, पण अशा प्रकारची कोणती यादी असो किंवा नसो लाखो मतदारांचे प्रतिनिधित्व करणारा एखादा खासदार किंवा आमदार कशाप्रकारे संसदेला सामोरे जातो हेसुद्धा महत्त्वाचे आहे.

सध्या सुरू असलेल्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या अधिवेशनामध्ये ज्या शब्दप्रयोगांची गरज नाही असे शब्दप्रयोग वापरण्याकडेच बहुतेकांचा कल दिसत आहे. सत्ताधारी पक्षाला अडचणीत आणण्यासाठी किंवा विरोधी पक्षाने उपस्थित केलेल्या एखाद्या विषयाला योग्य उत्तर देण्यासाठी शब्दांची योजना करताना जर भान ठेवले नाही तर विनाकारण वाद निर्माण होतो. सभागृहात गोंधळ होतो. मुख्य विषय बाजूला पडून या गोंधळामुळे निर्माण झालेल्या विषयावर चर्चा रंगू लागते. सभागृहाचे कामकाज चालवण्याची जबाबदारी जरी पिठासन अधिकाऱ्याची असली तरी आपल्या पक्षाचे नेते सभागृहात कशा प्रकारची वर्तणूक ठेवत आहेत आणि शेरेबाजी करत आहेत यावर नियंत्रण ठेवण्याचे काम मात्र संबंधित पक्षाच्या प्रमुखांनाच करावे लागणार आहे.

# पुरस्कार प्राप्त युवा शेतकरी यांनी होळीच्या दिवशी जीवनयात्रा संपली

**जालना । प्रतिनिधी**

**पंचक्रोशीतील शेतकऱ्यांच्या पाण्याच्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी सातत्याने संघर्ष करणारे शेतकरी कैलास अर्जुनराव नागरे यांनी १३ मार्च रोजी होळीच्या दिवशी आपल्या शेतामध्ये जीवन यात्रा संपली. या धक्कादायक घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून, शेतकरी वर्गात तीव्र संतापाची लाट उसळली आहे.**



कैलास नागरे हे बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजाचा यांनी जलसमृद्धी साठी युवा शेतकरी पुरस्कार प्राप्त शेतकरी होते आणि त्यांनी पाण्याच्या समस्यांवर शाश्वत उपाय शोधण्यासाठी अनेक वर्षे प्रयत्न केले होते. त्यांनी आत्महत्येपूर्वी मिळून आलेल्या चिठ्ठीत त्यांनी राज्य सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. नागरे यांनी खडकपूर्णा डाव्या कालव्यातून शेतीसाठी पाणी सोडण्याची मागणी केली होती. त्याशिवाय कर्जमाफी आणि शेतीसंबंधित अन्य समस्यांचे निराकरण करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली होती. शेतकऱ्यांनी कैलास नागरे यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यास नकार दिला आहे. त्यांच्या मागण्या मान्य केल्याशिवाय अंतिम संस्कार होणार नसल्याचे ठामपणे सांगण्यात आले आहे. या घटनेमुळे संतप्त शेतकऱ्यांनी शासनाविरोधात आवाज उठवला आहे, ज्यामुळे परिसरात तणाव निर्माण झाला आहे. नागरे यांनी चिठ्ठीत लिहिले होते, ''शेती आहूती मागते आहे, कृपया १४ गावातील पंचक्रोशीत पाणी द्या.'' त्यांनी आपल्या शेतीसह पंचक्रोशीतील सर्व शेतकऱ्यांच्या पाण्याच्या समस्यांचे तातडीने निराकरण करण्यासाठी सरकारला आवाहन केले होते. शेतकरी वर्गातील संताप आणि तणाव वाढत चालला आहे, आणि शेतकरी व ग्रामस्थांनी शासनाने त्वरित पावले उचलून नागरे यांच्या मागण्या मान्य कराव्यात, अशी मागणी केली आहे.

## आष्टीत आज ह.भ.प.श्रीहरि चांगुणे महाराज यांचे हरिकीर्तन

**आष्टी । पतिनिधी**

आष्टी शहरातील वसंतनगर येथील श्री जगतगुरु तुकाराम महाराज मंदीर आवारात सुरु असलेल्या ३७५ वा. त्रिशतकोत्तर अमृत महोत्सवी संत तुकाराम महाराज बीज अखंड विठ्ठलनाम सप्ताह सोहळ्यात आज शुक्रवार दि.१४ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ७ ते ९ यवेळात ह.भ.प.श्रीहरि महाराज चांगुणे यांचे हरिकीर्तन होणार आहे.उद्या शनिवारी ह.भ.प.विजयकुमार फड महाराज यांचे हरिकीर्तन होणार आहे. सोमवार दि.१७ मार्च रोजी सकाळी १० ते १२ यावेळेत ह.भ.प. संतोष महाराज मोरे यांचे काल्याचे कीर्तन होणर आहे. या सप्ताहात गाथा पारायण व विठ्ठल नामजप सोहळा होत आहे. काकडा भजन,विष्णु सहस्त्रनाम, गाथा पारायण, विठ्ठलनाम जप, संत एकनाथ महाराज संगीत चरित्रकथा,हरिपाठ, हरिकीर्तन व रात्री ९ नंतर महाप्रसाद पंगत होत आहे.

# जामगावचे सरपंच राधेशाम धस यांची दोन फेसबुक पेजवाल्यांविरोधात पोलिसांत तक्रार

**आष्टी । प्रतिनिधी**

**तालुक्यातील जामगाव येथील एका व्यक्तीचा खुन झाल्याची घटना दि. १२ मार्च रोजी घडली होती. या घटनेतील आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले असून संबंधितावर गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू असतानाच या घटनेशी जामगाव चे सरपंच राधेश्याम धस यांचा कसलाही संबंध नसताना काही फेसबुक पेजवर त्यांच्या बाबत मानहानीकारक मजकूर टाकून बदनामी करण्याचा प्रयत्न केल्याने सरपंच धस यांनी संबंधितांवर कारवाई करण्यात यावी याबाबत आष्टी पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दाखल केला आहे.**

याबाबत पोलिसांना दिलेल्या तक्रार अर्जात सरपंच राधेशाम धस म्हटले आहे की, दि. १३/०३/२०२५ रोजी दुपारी ०१:४० वाजता मला भाऊसाहेब मुरलीधर माने रा. मुर्शदपुर ता. आष्टी, जि. बीड यांचा मो.क. ७०८३२९१०१० या क्रमांकावरून माझा मोवाईल क्र. ७७०९९९१४१४ यावर फोन आला याने मला सांगितले की,स्टोरी डॉट कॉम व 'राजकारण महाराष्ट्राचे' या दोन नावाच्या फेसबुक पेज वरुन ''बीड ब्रेकींग सुरेश धसांच्या जामगावातील बेपत्ता धनंजय रणसिह यांचा मृतदेह सापडला, ३० हजारांच्या वादातून काटा काढल्याची माहिती, धसांचे पुतणे जामगावचे सरपंच, आणि आरोपी अज्ञात'' अश्या आशयाचा मजकूर पोस्ट करण्यात आला आहे.याची मी शहानिशा केल्यानंतर सदरील पोस्ट मुळे माझी समाजामध्ये खुप बदनामी झालेली आहे.तसेच माझे हॉटेल व्यवसाय असून या फेसबुक पेजवरील पोस्टमुळे माझ्याविषयी नाहक लोकांचे मनात भिती निर्माण झाल्याने माझे हॉटेलचे आर्थिक नुकसान देखील झाले आहे.गुरुवारी दिवसभर मला प्रचंड मानसिक त्रास झाला आहे.सदरची पोस्ट जाणीवपुर्वक मला मानसिक त्रास व्हावा व माझी लोकप्रीयता कमी व्हावी तसेच माझे आर्थिक नुकसान व्हावे यासाठी टाकलेली आहे. करीता ''स्टोरी डॉट कॉम'' व 'राजकारण महाराष्ट्राचे' हे पेज जी व्यक्ती चालवते त्या व्यक्तीचा शोध घेवुन संबंधीत व्यक्तीविरुध्द व त्या पेज वर माझ्या विरुध्द माझी बदनामी होईल,मला मानसिक त्रास होईल,या उद्देशाने टाकलेली पोस्ट यांचेवर कायदेशीर कारवाई व्हावी.तसेच या पोस्ट वर अनेक लोकांनी बदनामी कारक व धमकी सारख्या कमेंट केलेल्या आहेत.या बदनामी कारक कमेंट टाकणाऱ्या व्यक्तींविरोधात देखील कायदेशीर कारवाई करण्यात येणे आवश्यक असल्याने माझे संबंधीत व्यक्ती विरोधात कायदेशीर पणे तक्रार असल्याचे पोलिसांना दिलेल्या अर्जात नमूद करण्यात आले आहे.त्याचबरोबर सरपंच राधेश्याम धस यांनी तक्रार अर्जासोबत संबंधित फेसबुक पेजचे स्क्रीन शॉट व विरोधात कमेंट करणाऱ्यांची नावे देखील सादर केली आहेत.

# परिवर्तन इंग्लिश स्कूल पाली येथे वार्षिक स्नेहसंमेलन श्रोते मंत्रमुग्ध

**बीड । प्रतिनिधी**

**पाली पंचक्रोशीतील लहान बालकांना घरातून बाहेर पडून संस्कारमय इंग्रजीतुन शिक्षण मिळवण्यासाठी सामाजिक चळवळीतून स्थापन झालेली संस्था- स्वराज शिक्षण प्रसारक मंडळा अंतर्गत स्थापन झालेली परिवर्तन इंग्लिश स्कूल पाली, ता. जि. बीड येथे शालेय अभ्यासक्रमाबरोबर विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.**

तसेच याही वर्षी नियमाप्रमाणे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले. या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी त्यांच्या कलेतून सामाजिक संदेश, नवनवीन नृत्य आणि नाटक सादर करण्यात आले. त्यामध्ये गणपती च्या गाण्याने सुरुवात, वेलकम या गाण्याने प्रमुख पाहुण्यांचे स्वागत, राधा कृष्णाची भूमिका, अनाथ आश्रमातील बहिण भावाची कहाणी, रमाबाई भीमराव आंबेडकर यांची कथा, संगीत गायन सुरांचा पूर, स्वच्छतेचा संदेश, द्रोणाचार्य व एकलव्य नाटक, व्यसनमुक्ती, गोरोबा कुंभाराची कथा, छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या चित्रपटातील नृत्य, देशभक्तीपर गीत, त्याचबरोबर सामाजिक जोपासना ठेवण्यासाठी रमजान ईद चे औचित्य साधून हिंदू-मुस्लिम, सिख- ईसाई हम सब भाई-भाई चा संदेश देत ''ईद मुबारक'' अतिश्य बहारदार नृत्य विविध प्रकारच्या वेशभुषेत सादर करण्यात आले. त्याप्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक मा.श्री. राजेंद्रजी मस्के (जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी)कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सौ. मंजुषा नवले (सरपंच-पाली) व श्री. महेंद्र वीर (उपसरपंच-पाली)




प्रमुख पाहुणे मा. श्री. शिवाजी बंटेवाड साहेब (पो. नि. ग्रा. पोलीस स्टेशन, बीड), डॉक्टर प्रफुल्ल सुस्कर (बालरोगतज्ञ - श्री.वेदांत हॉ. बीड), मा. श्री. चंद्रसेन दादा नवले (माजी-उपसभापती), मा. श्री. विजयकुमार मस्के (विभागीय अधिकारी- श्री. छ.रा. शाहू बँक), मा. श्री. शरद गावडे (मॅनेजर-शाहू बँक), श्री. लक्ष्मण दादा नवले, डॉ. दत्ता सोळुंके, प्रा. राजेश वीर , श्री. आस्करभाई शेख, श्री. अंबादास गुजर (सरपंच-मंजेरी ह.), श्री. सुशेनजी खरसाडे (सरपंच-आ.वडगाव), श्री. तुळसीदास महाराज शिंदे (उपसरपंच-कोळवाडी) आणि यांच्यासह पाली पंचक्रोशातील सर्व माजी सरपंच, उपसरपंच, चेअरमन, शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर, वकील, इंजिनियर, ग्रामसेवक, विविध पदावर कार्यरत असणारे अधिकारी, शेतकरी वर्ग, विशेष उपस्थिती शाळेचे सर्व पालक, त्याचबरोबर गावातील लहान थोर बालक, महिला, ग्रामस्थ, पत्रकार- रवींद्र भालेकर आणि प्रतिष्ठित नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन परिवर्तन इंग्लिश स्कूलचे संस्थापक अध्यक्ष प्रा. अशोक लक्ष्मण शिंदे व संचालिका संस्थापक सचिव प्रा. सौ. श्रद्धा अशोक शिंदे यांनी केले. तसेच सूत्रसंचालन श्री.अनिल भोसले सर व विद्यार्थिनी कु.अनुजा वीर आणि कु. सायली देशमाने यांनी केले. शाळेतील शिक्षिका सौ. स्वाती औटे , सौ. रोहिणी राऊत यांच्यासह संचालिका यांनी खूप मेहनत घेतली. याची पावती म्हणून शाळेतील पालक वर्ग व पाली पंचक्रोशीतील सर्व नागरिक यांच्याकडून शाळेचे खूप कौतुक करण्यात आले. हे वार्षिक स्नेहसंमेलन यशस्वी पार पडण्यासाठी शाळेतील सर्व पालकांनी भरपूर सहकार्य केले त्याबद्दल सर्व पालकांचे शाळेच्या वतीने खूप खूप आभार मानण्यात आले.

# लाडक्या बहिणीचा फटका ; अनेक योजनांना कात्री लागणार

## आदिवासी, समाजकल्याण विभागाचे ७ हजार कोटी वळवले

**मुंबई । पतिनिधी**

**राज्य सरकारच्या लाडकी बहीण योजनेचा मोठा फटका इतर विभागांना मिळत असल्याचे दिसत आहे. लाडकी बहीण योजनेसाठी इतर विभागांचा निधी अर्थविभागाने वळवला असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. सामाजिक न्याय विभागाचा ३ हजार कोटी तर अदिवासी विभागाचा तब्बल ४ हजार कोटींचा निधी अर्थविभागाने वळवला आहे. त्यामुळे समाजकल्याण आणि आदिवासी विभागाच्या अनेक योजनांना कात्री लागण्याची शक्यता आहे.**

### मंत्री सिरसाट यांची कबुली

समाजकल्याण विभागाचे मंत्री संजय सिरसाट यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, ''नियमानुसार दोन्ही विभागांना निधी देणे बंधनकारक आहे. संविधानामध्ये त्याची तरतूद आहे. पण या दोन्ही विभागांचा निधी हा इतर ठिकाणी वळवण्यात आला. लाडकी बहीण योजना सुरू ठेवायची असेल तर त्यासाठी पैसा उभा करणे आवश्यक आहे. पण आदिवासी आणि समाजकल्याण ही दोन्ही विभाग महत्त्वाची आहेत. दलित आणि आदिवासी समाजासाठी असणारा निधी वळवण्यात आला आहे. अशी कबुली मंत्री सिरसाट यांनी दिली आहे.

विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्य सरकारने लाडकी बहीण योजना सुरू केली होती. त्या योजनेसाठी पैसे उभे करताना इतर विभागांच्या निधीमध्ये कपात करण्यात येत असल्याचे आरोप होत होते. यंदाच्या अर्थसंकल्पात लाडकी बहीण योजनेसाठी ३६ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्यासाठी आता समाजकल्याण आणि आदिवासी विभागाचा निधी वळवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. समाजकल्याण विभागाचा ३ हजार कोटी तर आदिवासी विभागाचा ४ हजार कोटी रुपयांचा निधी अर्थखात्याने वळवला असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या दोन्ही विभागांकडून अर्थमंत्री अजित पवारांच्या निर्ययावर नाराजी व्यक्त केली जात आहे. अर्थखात्याच्या या निर्णयामुळे या समाजकल्याण आणि आदिवासी विकास खात्याच्या अनेक योजनांना कात्री लागणार आहे.

# मृत्यूस कारणीभूत ठरल्याने दुचाकीस्वारास सहा महिन्याची शिक्षा

## प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी क्र.२ माजलगाव यांचा निकाल

**माजलगाव । प्रतिनिधी**

**दि.२४/०१/२०१९ रोजी ४ वाजताचे दरम्यान केसापुरी कॅम्प दोस्ताना हॉटेल समोर शे.रतन हे ऑटोतून उतरून पायी जात असताना मो.क्र.एम.एच.२३ यू.९६८० चा चालक नामे हनुमंत गोरख नागरगोजे याने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल निष्काळजीपणे व भरधाव वेगात चालून शे.रतन यांना जोराची धडक देऊन जखमी केले, उपचारा दरम्यान मृत्यू झाला. शेख महेमूद शे.रतन याने पोलीस स्टेशन माजलगाव शहर येथे आरोपी विरोधात फिर्याद दाखल केली. त्यानंतर प्रकरणात तपास करून मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी क्र.२ यांच्या न्यायालयात आरोपिता विरूद्ध त.अधिकारी एस.बी.शेटे (एएसआय) यांनी दोषारोपपत्र दाखल केले.**

सदर गुन्ह्यामध्ये गुन्हा सिद्ध करण्यासाठी सहाय्यक सरकारी वकील एस.एन.व्यवहारे माजलगाव न्यायालयामध्ये सरकार पक्षाच्या वतीने युक्तिवाद करून सदर प्रकरणामध्ये एकूण ६ साक्षीदार तपासले त्यामध्ये मयताचा मुलगा फिर्यादी शेख महेमुद याची साक्ष नोंदविण्यात आला तसेच ज.पंच सय्यद रफीक प्रथमदर्शनी साक्षीदार म्हणून खिजरशहा बाबरशहा साक्षीदार इनायत खान हमिदखान पठाण व पो.ठा.अं.माया अनिल वाघमारे घ.पंच शेख मोहसीन याची साक्ष कोर्टात नोंदविण्यात आले. प्रथमदर्शनी साक्षीदाराचे बयान घटनास्थळ, जप्ती, तसेच प्रत्यक्षदर्शी व वैद्यकीय पूरावाचे मा. कोर्टाने अवलोकन करून आरोपी नामे हनुमंत गोरख नागरगोजे यास दोषी ठरवून मा.श्रीमती.रंजना गोसावी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी क्र.२ माजलगाव यांनी कलम २७९ भा.द.वी नुसार तीन महिने शिक्षा व एक हजार रुपये दंड तसेच कलम ३०४ (अ) भा.द.वी.नुसार सहा महिने साधा कारावासाची शिक्षा व एक हजार रुपये दंड तसेच १८४ मो.वा.का.नुसार तीन महिने व एक हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली.सर्व शिक्षा एकत्रीत करण्याचा आदेश झाला आहे.सदर प्रकरणात सरकार पक्षाच्या वतीने सरकारी वकील म्हणून ॲड.एस.एन.व्यवहारे यांनी काम पाहिले तसेच कोर्ट पैरवी म्हणून रामहरी उघडे यांनी सहकार्य केले.

## पान १ वरून...

### राज्यात उष्णतेचा कहर !

वर पोहचले आहे. सध्या मार्च महिना सुरू असून फेब्रुवारीपासूनच राज्यात उष्णतेच्या झळा पोहचत आहेत. दिवसभर उन्हाचा चटका चांगलाच वाढला असून अनेक शहरांमध्ये तापमान ४० अंशाच्यावर पोहचले आहे. पुढील काही दिवस तापमानाचा पारा अशाच प्रकारे वाढणार असल्याची शक्यता हवामान विभागातर्फे वर्तविण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी विनाकारण घराबाहेर पडणे टाळावे, तसेच घराबाहेर पडताना योग्य ती काळजी घ्यावी; असे आवाहन देखील हवामान विभागाच्या वतीने नागरिकांना करण्यात आले आहे. यंदाच्या हंगामातील सर्वाधिक तापमान राजगुरूनगर येथे ४०.७ अंश सेल्सिअस एवढी नोंद झाली असून शिरूर आणि तळेगाव ढमढेरे येथील कमाल तापमान ४० च्या पुढे नोंदविले गेले. मार्च महिन्याच्या दुऱ्याच आठवड्यात पुणे जिल्ह्यातील कमाल तापमानाने ४१ अंशापर्यंत मजल मारली असून उन्हाच्या चटक्याने अंगाची लाहीलाही होत आहे. जळगाव जिल्ह्यात देखील तीन-चार दिवस उष्णतेची लाट राहणार असल्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. दोन दिवसांपासून तापमानात वाढ होत असल्याने पारा ४० अंशाच्या दिशेने जात आहे. तापमानात वाढ झाल्याने नाशिककरांना उन्हाचे चटके जाणवू लागले आहेत. मागील काही दिवसांपासून नाशिकच्या तापमानात सातत्याने वाढ होत आहे. नाशिक जिल्ह्यातील मालेगावमध्ये सर्वाधिक ४० अंश तापमानाची नोंद झाली आहे.

**विदर्भात उष्णतेच्या लाटेचा इशारा**

हवामान विभागाने विदर्भात उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला असून ११ पैकी ६ जिल्ह्यांतील तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे गेले आहे. दरम्यान अकोल्यात सर्वाधिक ४१.३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. यंदाच्या उन्हाळ्यात पहिल्यांदाच विदर्भातील तापमानाचा पारा ४१ अंश सेल्सिअसच्या पुढे गेले आहे. नाशिक जिल्ह्यात देखील मार्च महिन्यातच पारा ३८.७ अंशावर पोहचले आहे.

------------

### बाजार समितीच्या नियमांमध्ये

कलम ५७ अन्वये व्यापाराच्या वैयक्तिक मालमत्तांची यादी करून जमीन महसूल थकबाकी कायद्यानुसार या सर्व मालमत्तांची एकत्रित लिलाव करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या प्रक्रियेला गती देऊन कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे संपूर्ण पैसे देण्यात येतील. या संपूर्ण प्रकरणात बैठकही घेण्यात येईल, असेही पणन मंत्री रावल यांनी सांगितले.

-------------

### खोक्याचा गेम ओव्हर,

दिवसांपूर्वी वनविभागाकडून खोक्याच्या घराची तपासणी करण्यात आली होती, यावेळी वनविभागाला खोक्याच्या घरातून जनावरांचे सुखलेले मांस आणि शिकारीसाठी लागणारे साहित्य सापडले होते. ते त्यांनी ताब्यात घेतले होते. तर ज्या ठिकाणी खोक्याने घरं उभारले होते ते वनविभागाच्या जागेवर उभारले असल्याची माहिती समोर आल्यानंतर वनविभागाकडून कारवाई करण्यात आली आहे. वनविभागाकडून खोक्याच्या घरावर बुलडोझर फिरवण्यात आले. यापूर्वीच त्याला नोटीस देखील देण्यात आली होती. त्यानंतर आता वनविभागाकडून खोक्याच्या घरावर मोठी कारवाई करण्यात आली आहे. तसेच खोक्यावर बीड जिल्हा हद्दपारीची कारवाई करण्यात आली असल्याने आता त्याचा गेम व्होअर झाला असल्याचे म्हटले जात आहे. शिवाय बीड पोलिसांनी खोक्याची कसून चौकशी केली तर बरेच गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे.

-----------

### वाल्मिक कराडपेक्षाही

पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी पुढे बोलताना परमेश्वर सातपुते म्हणाले, दादा खिंडकर हा माजी आमदार अमरसिंह पंडित आणि विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांच्या गटाचा आहे. अमरसिंह पंडित यांनीच त्याची पाठराखण केली. त्यामुळे अमरसिंह पंडित हाच खिंडकरचा आका असल्याचा गंभीर आरोप सातपुते यांनी केला. तसेच तो वाल्मिक कराडपेक्षाही मोठा गुन्हेगार असून त्याच्या दहशतीखाली तीन गावे असल्याचे ते म्हणाले. दादा खिंडकर याच्यासोबतीला गुंडांची टोळी असून त्यांचा वेळीच बंदोबस्त करणे गरजेचे असल्याचेही सातपुते म्हणाले.

------------

### धनंजय देशमुखांचा

दोन जुने व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मारहाण आणि घरावर हल्ला असे दोन गुन्हे त्याच्यावर दाखल करण्यात आले आहेत. दादा खिंडकर हा बीडच्या बाभुळवाडी या गावाचा सरपंच असून धनंजय देशमुख यांजा तो साडू आहे. दरम्यान, गुन्हा दाखल होताच दादा खिंडकर हा गुरुवारी दुपारी पोलिस अधिक्षक कार्यालयात जावून पोलिसांना शरण आला. पोलिसांनी त्यास ताब्यात घेऊन पिंपळनेर पोलिसांच्या स्वाधिन केले आहे.

-----------

### शासकीय जागा अतिक्रमण

नागरिकांना होत असलेली वाहतुकीची कोंडी मोकळी करून देण्याची गरज आहे मात्र अतिक्रमण धारक हे नगरपंचायत मधील तसेच राजकीय नेतेमंडळींच्या जवळचे असल्याने यांच्यावर कारवाई प्रशासन करत नसल्याचे सर्वसामान्य नागरिकांतून बोलले जात आहे आज सध्या घडीला मुख्य मार्केट म्हणजे कानडी रोड तहसील कार्यालय समोर पंचायत समिती समोर अशा अनेक भागात कळम रोड परिसर अशा अनेक ठिकाणी अतिक्रमण केलेले आहे हे अतिक्रमण काढल्यास वाहतुकीस मोकळा मार्ग होईल व कुठल्याही प्रकारची अडचण होणार नाही त्यामुळे शहरातील सर्व शासकीय जागेतील रस्त्यावरील अतिक्रमण काढावे अशी विनंती सर्वसामान्य नागरिकाकडून होत आहे.

--------------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार, दि. १४ मार्च २०२५



## माजलगाव मिसेस या अनोख्या उपक्रमाचे आयोजन

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरांमध्ये महिला दिनानिमित्त माजलगाव मिसेस हा प्रथमच एक अनोखा उपक्रम दिनांक १६ मार्च २०२५ रोजी ईगलवूड इंग्लिश स्कूल फुले पिंपळगाव, माजलगाव येथे आयोजित करण्यात आलेला आहे.

स्त्री म्हणजे त्याग, प्रेम, कणखरपणा आणि प्रेरणा आहे तिचा गुणगौरव व्हावा, व त्यांच्या अंगी असलेले कला कौशल्य गुण व्यक्तिमत्व सादर करणे करिता एक मंच निर्माण व्हावा करिता या अनोख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवून विजयी होणाऱ्या स्पर्धकास पैठणी साडीसह गृह उपयोगी वस्तूंचा संच त्याचबरोबर विविध आकर्षक पारितोषिके प्राप्त होणार आहेत...

तरी रोटरी क्लब माजलगाव सिटी चे विद्यमान अध्यक्ष तथा श्री मंगलनाथ मल्टीस्टेट चे व्यवस्थापकीय संचालक ॲड.रवींद्र कानडे, व ईगलवूड इंग्लिश स्कूल माजलगाव च्या अध्यक्षा व उपक्रम प्रमुखं सौ.अर्चना पवार यांनी माजलगाव शहर व परिसरातील जास्तीत जास्त महिलांनी सहभाग नोंदवून या अनोख्या उपक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन करण्यात आले आहे.

## चॉकलेटचे अमिष दाखवून सहा वार्षिय चिमुकलीवर अत्याचार नराधमास वीस वर्षाची सक्त मजुरी; ११ हजारांचा दंड

अंबाजोगाई । प्रतिनिधी

तालुक्यातील सहा वर्षिय अल्पवयीन मुलीस शेजारीच राहणार्या नराधमाने चॉकलेटचे अमिष दाखवून तिच्यावर अत्याचार केल्या प्रकरणी अतिरिक्त जिल्हा सत्रन्यायाधीश श्रीमती एस.जे.घरत यांनी वीस वर्षाची सक्त मजुरी व आकरा हजार रूपयांचा दंड ठोठावला आहे.

अंबाजोगाई तालुक्यातील अल्पवयीन मुलीस चॉकेलटचे अमिष दाखवून शेजारी राहणार्या विष्णु बाबुराव सादुळे याने घरात बोलवून दि.२३ मार्च २०२३ रोजी तिच्यावर अत्याचार केला. यानंतर ही अल्पवयीन मुलगी घरी जावून एकटीच बसली होती. कोणासही बोलत नव्हती. तिने पोट दुखत असल्याचे सांगितले. त्यामुळे पालकांनी तिला काय झाले तु बोलत का नाहीस, पोट कशाने दुखत आहे. असे विचारले असता तिने घडलेला प्रकार सविस्तर सांगितला.

घटनेच्या दुसर्या दिवशी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास अल्पवयीन पिढीता ही शाळेतून घरी आली. व तसाच उदास चेहर्याने घरात बसली होती. पालकांनी परत तिला काय प्रकार झाला आहे असे विचारले असता तिने दुपारी दोन ते तीन वाजता शेजारी मैत्रिणीच्या घरी खेळत असताना शेजारी राहणारा नराधम विष्णु बाबुराव सादुळे हा तिथे आला. आणि तिला म्हणाला माझ्या सोबत चल तुला मी चॉकलेट देतो. म्हणून तिला त्याच्या जुन्या घरी घेवून गेला. घराचा दरवाजा लावून घेतला व तिच्यावर अत्याचार केला. हा झालेला प्रकार कोणालाही सांगु नकोस नाहीतर तुला जिवे मारून टाकीन अशी धमकी दिली. बर्दापुर पोलिसात ३७६, ५०६ भादंवी सह कलम ३.४ (२) ५ एम., ६ बाललैकिंग अत्याचार अन्वये गुन्हा नोंद होवून पुढील तपास पोलिस अधिक्षक कार्यालयाच्या पिंक पथकाकडे वर्ग करण्यात आला. या प्रकरणाची संपूर्ण तपास पोलिस उपनिरिक्षक सुचिता शिंगाडे यांनी दोषारोपपत्र अंबाजोगाईतील अप्पर सत्र न्यायालय दाखल केले. या प्रकरणाची आज सुनावणी झाली. सदर प्रकरणामध्ये सरकार पक्षाच्या वतीने ॲड.शिवाजी मुंडे यांनी नऊ साक्षीदार तपासले. पिढीतेचा जवाब व इतर साक्षी पुरावा व सरकारी वकीलाचा युक्तीवाद न्यायालयाने ग्राह्य धरून नराधम आरोपीस कलम ६ बाललैगिंक अत्याचार कायद्या प्रमाणे वीस वर्षाची सक्त मजूरी व दहा हजारांचा दंड तसेच ५०६ भादवी प्रमाणे एक वर्षाचा कारावास व एह हजारांचा दंड अशी शिक्षा अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्रीमती एस.जे.घरात यांनी ठोठावली.

घटनेच्या निषेधार्थ अंबाजोगाईतील हजारो विद्यार्थीनींनी काढला होता मोर्चा

सहा वर्षिय अल्पवयीन मुलीवर शेजारीच राहणार्या नराधमाने चॉकलेटचे अमिष दाखवून अत्याचार केल्यानंतर तालुक्यामध्ये खळबळ उडाली होती. सदरील घटना ही निंदनीय असून शहरातील सर्व शाळांच्या मुलींनी हजारोंच्या संख्येने डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते उपजिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला होता. या मोर्चादरम्यान विद्यार्थीनींनी नराधमास फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी केली होती. या मोर्चाची देखील न्यायालयाने गंभीर दखल घेतली. या शिक्षेमुळे यापुढे अशा नराधमाची हिम्मत होणार नाही. हेच या निकालावरून स्पष्ट होते..

## सरपंच महेश गायके यांच्याकडून विद्यार्थ्यांना शालेय बॅगचे वाटप

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील केंद्रीय जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना वार्षिक स्नेहसंमेलनाचे बशिस म्हणुन शालेय बँगचे वाटप करण्यात आले आहे.



गेल्या काही दिवसापुर्वी युसूफवडगांव येथील केंद्रीय जिल्हा परिषद प्राथमिक शाळाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले होते.यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणुन सरपंच महेश गायके हे उपस्थित होते यावेळी त्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना स्नेहसंमेलना मधील विद्यार्थ्यांना नव्हे तर शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना काही तरी चांगले जे विद्यार्थ्यांना कामी येईल असे बशिस देऊ असे त्यांनी जाहीर केले होते.त्याप्रमाणे त्यांनी आज होळीच्या सणाचे औचित्य साधुन शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शालेय बँगचे वाटप केले.यावेळी सरपंच महेश गायके,उपसरपंच महेश लामतुरे,ग्रा सदस्य चंद्रकांत भुसारी,मन्मथ पाटील,संजय लांडगे,दादा निकम,प्रविण वैरागे,ओमकार लामतुरे,सुर्यकांत थळकरी,काशीनाथ खरबड तसेच रूपेश बोरगावकर,विकास जाधव,अरुण राऊत,राजु गायके, अनिल उजगरे,सचिन जावळे,बापुसाहेब साखरे,भाऊ चोपणे,सुनिल मुकदम,उत्रेश्वर खरबड,विक्रम सावंत,पप्पु झोरीसह शाळेतील सर्व शिक्षकवृंद व पालक उपस्थित होते.

## वाघोरा जि.प. शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील वाघोरा येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये ११ मार्च मंगळवार रोजी''सांज चिमण पाखरांची'' वार्षिक स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट नाटिकेद्वारे प्लास्टिकच्या अति वापरामुळे आपल्या दैनंदिन जीवनात अनेक अडचणी निर्माण होऊन पर्यावरणाचे नुकसान होते. पशु,पक्षी व माणसांना कर्करोगापर्यंत आजार होतात प्लास्टिक पिशव्या ऐवजी कागदी, कापडी पिशव्या वापराव्यात हा संदेश दिला.



सदर कार्यक्रमाचे उद्घाटन केंद्रीय मुख्याध्यापक नारायण कचरे, केंद्रप्रमुख बाळकृष्ण वाघमारे, गावचे सरपंच मधुकर बादाडे, शालेय व्य. समितीचे अध्यक्ष अरुण बादाडे, उपाध्यक्ष गणेश बादाडे,टी.एल. बादाडे,अविनाश येळंबकर,मोरेश्वर जोशी सांस्कृतिक विभाग प्रमुख केशव बादाडे, मुख्याध्यापक बादल डेंगळ यांच्या हस्ते दीप प्रज्वलन, प्रतिमापूजन केले. प्रास्ताविक विनोद जाधव तर सूत्रसंचालन अनंतराव शिंदे यांनी केले.उपस्थित पाहुण्यांचा शिक्षकांनी सत्कार केला यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले त्यामध्ये विद्यार्थ्यांनी ''जागा हो माणसा, जागा हो..! या नाटकेद्वारे पर्यावरणाचे रक्षण करण्याचा संदेश दिला.भाऊ कदम जाणार शाळेत विनोदी नाटिका सादर केली.लेझीम नृत्य,दांडिया, कोळीगीत, देशभक्ती,भीम गीत,शेतकरी गीत, फनी साँग,लावणी अशा बहारदार गीतावर विद्यार्थ्यांनी सुंदर नृत्य सादर केले. कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती प्रहार संघटनेचे तालुकाध्यक्ष लक्ष्मण सरवदे, भागवत कोकने, महेश खुणे,नारायण भालशंकर यांची उपस्थिती होती.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शरद कुलकर्णी, राजेभाऊ आबूज, बबन पोटे, तुलसीदास गुंडेकर यांनी परिश्रम घेतले.गावातील तरुण मंडळींनी, वाघेश्वर मित्र मंडळ यांनी तन-मन-धनाने विशेष सहकार्य केले त्यामुळे हा कार्यक्रम यशस्वी झाला उपस्थित त्यांचे आभार गोवर्धन बादाडे यांनी मानले कार्यक्रमास प्रतिष्ठित,तरुण मंडळ,नागरिक, गावकरी,माता-पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एप्रिलपासून नवे शैक्षणिक वर्ष सुरू होणार असल्याची चर्चा?

अंबाजोगाई । प्रतिनिधी

आतापर्यंत १५ एप्रिलपर्यंत परीक्षा घेण्याची पद्धत रूढ होती. मात्र, नव्या वेळापत्रकानुसार परीक्षा मार्चपर्यंत पूर्ण करून एप्रिलपासून नवे शैक्षणिक वर्ष सुरू केले जाणार आहे. शैक्षणिक वर्षाच्या कामकाजाचे दिवस २३४ असणार आहेत. विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी विशेष वर्ग घेतले जाणार असून, शालेय शिक्षणात नवे बदल होतील, अशी माहिती शालेय शिक्षण खात्याकडून मिळत आहे



शाळांमध्ये पहिली ते नववीच्या वार्षिक परीक्षा, संकलित चाचणी २ यासाठी जाहीर केलेल्या वेळापत्रकाबाबतच्या शिक्षकांनी मांडलेल्या समस्यांच्या खोलात जाऊन आवश्यकतेनुसार उपाययोजना केल्या जातील, असे राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेचे आयुक्त राहुल रेखावार यांनी स्पष्ट केले.राज्यातील पहिली ते नववीच्या परीक्षा एकाच वेळी घेण्यासाठीचे वेळापत्रक राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने जाहीर केले आहे. त्यानुसार ८ ते २५ एप्रिल या कालावधीत नियतकालिक मूल्यांकन चाचणी, संकलित चाचणी २ या परीक्षा घ्याव्या लागणार आहेत. परीक्षा एप्रिलअखेरपर्यंत लांबणार असल्याने उत्तरपत्रिका तपासणे, निकाल तयार करण्यास वेळच मिळणार नसल्याचा मुद्दा शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांकडून उपस्थित करण्यात आला. या अनुषंगाने मुख्याध्यापक संघ यांच्यासह अन्य पदाधिकार्यांनी शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंग, एससीईआरटीचे संचालक राहुल रेखावार यांची भेट घेऊन वेळापत्रकात बदल करण्याची मागणी केली.

**बीए/बीएस्सी बीएडऐवजी आता असणार 'आयटीईपी'**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून चार वर्षांचा बीए बीएड आणि बीएससी बीएड (एकात्मिक) अभ्यासक्रम रद्द करण्यात आला असून त्याऐवजी चार वर्षांचा एकात्मिक शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम (आयटीईपी) अभ्यासक्रम केंद्रीय स्तरावर सुरू करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमांची सीईटी राज्यातील सीईटी सेलकडून नव्हे, तर एनटीएकडून घेतली जाणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना नव्याने एनटीएच्या संकेतस्थळावर नोंदणी करावी लागणार आहे. राष्ट्रीय अध्यापक शिक्षक परिषदेने यंदापासून देशभरात सुरू असलेले ४ वर्षीय बीए/बीएससी बीएड (एकात्मिक) अभ्यासक्रम बंद केले आहेत. याऐवजी यंदापासून चारवर्षीय एकात्मिक शिक्षक प्रशिक्षण या अभ्यासक्रम सुरू केला आहे. उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाने चार वर्षांच्या बीए/बीएससी - बीएड (एकात्मिक) अभ्यासक्रमासाठी सामाईक प्रवेश परीक्षा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येऊ नये असे सीईटी सेलला कळविले आहे. हाच अभ्यासक्रम केंद्रीय स्तरावर एकत्र करत परिवर्तीत केला आहे. यामुळे सीईटी सेलकडून घेण्यात येणारी सीईटी यंदा होणार नाही. सामाईक प्रवेश कक्षाकडून आता या सीईटीसाठी भरलेले शुल्क विद्यार्थ्यांना परत केले जाणार आहेत.

## इको फ्रेंडली होळी साजरी करा -प्राचार्या सविता शेटे

**बीड । प्रतिनिधी**

**शिक्षणाचे तीर्थक्षेत्र संस्कृती विद्यालय येथे आज अंधश्रद्धा निर्मूलन समिती मार्फत सण व उत्सवात होणारे पर्यावरणाचे नुकसान व त्याचे परिणाम यावर मुलांना मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले होते.**

या चर्चासत्राला राज्य कार्यवाह विवेक वाहिनी विभाग अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या प्रमुख सौ .सविता शेटे मॅडम उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून श्री .विजय देवरे कार्यवाह अंधश्रद्धा निर्मूलन समिती हे उपस्थित होते .कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ . दत्ता नलावडे सर हे होते .

प्रथम प्राचार्य शेटे मॅडम यांचे स्वागत श्रीमती ऋतुजा धर्माधिकारी व श्रीमती साक्षी गवळी यांनी केले . वैभव बर्गे या विद्यार्थ्यांने स्वागत गीताचे गायन केले .पाहुण्यांचा परिचय ऋतुजा धर्माधिकारी मॅडम यांनी करून दिला .कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री .अतुल कुलकर्णी सर यांनी केले .प्रमुख पाहुण्यांचे स्वागत श्री .अश्विन कांबळे सर यांनी केले .भारतीय संस्कृती ही खूप महान आहे .प्रत्येक सण - उत्सव हा विशिष्ट हेतूने असतो परंतु अलीकडे या सण उत्सवामध्ये खूप कुप्रथा घुसत आहेत याबद्दल आपण जागरूक राहिला पाहिजे.सण उत्सव साजरे केले पाहिजेत परंतु त्यामध्ये कुठलाही आतातायीपणा अंधश्रद्धा असू नये ज्यामुळे पर्यावरणाचे नुकसान होईल व त्याचे परिणाम मानव जातीला भोगावे लागतील. येणाऱ्या होळी सणामध्ये होळी करताना कचरा म्हणजे पालापाचोळा याची होळी करावी तसेच रंगपंचमीला वनस्पतीच्या पानापासून व फुलापासून बनवलेले रंग वापरावेत असे आवाहन शेटे मॅडम यांनी केले .कार्यक्रमाचा समारोप करताना डॉ .दत्ता नलावडे सर यांनी इको फ्रेंडली सण उत्सव सादर करणे ही काळाची गरज आहे .यामुळे पर्यावरणाचे संतुलन राहील व येणाऱ्या भविष्यातील पिढ्यांना आपण स्वच्छ प्रदुशनमुक्त पर्यावरणाची देणगी देऊ यासाठी पर्यावरणाचे रक्षण करू असे मुलांना सांगितले. सर्व विद्यार्थ्यांकडून पर्यावरण रक्षणाचा संकल्प यावेळी करण्यात आला.आभार प्रदर्शन साक्षी गवळी मॅडम यांनी केले .विश्व प्रार्थनेने कार्यक्रमाचा समारोप झाला .कार्यक्रम येशूचे साठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.




पान ६ वरून...

### मोबाईलच्या जमान्यात

यावेळी भाविकांच्या हस्ते करण्यात आले. दिवसभर महाराष्ट्राच्या कानाकोपर्यातून आलेल्या भाविकांची दर्शनासाठी रिघ लागली होती. रात्री ९ ते ११ वा. ह.भ.प. इंदुरीकर महाराजांच्या किर्तनाने कार्यक्रमाची सांगता झाली. संत शिरोमणी शेख महंमद महाराज प्रतिष्ठानचे अध्यक्ष ह.भ.प. सिध्दीनाथ मेटे महाराज यांनी आभार मानले.

पुढे बोलतांना इंदुरीकर महाराज म्हणाले की, कर्म हाच देव असून आपण जे काम करतो ते मनापासून करा देव मिळाल्याखेरीज राहणार नाही. जो जसे कर्म करेल तसेच त्याला फळ मिळेल. चांगले कर्मच मुतीच्या मार्गाला घेवून जावू शकते. संत शेख महंमद महाराजांनी अहंकार, काम,क्रोध,लोभ,मद,मत्सर आदी विकारांवशी युध्द करुन मनावर विजय मिळवला व योगसंग्राम प्राप्त झाला. त्यांनी आयुष्यभर समाज प्रबोधनाचे कार्य केले, साहित्य लिहीले म्हणून वारकरी परंपरेत त्यांचे नाव आदराने घेतले जाते.

चौकट - एका लिकवर संत शेख महंमद महाराजांची सर्व माहिती उपलब्ध

संत शेख महंमद महाराज डॉट कॉम या वेबसाईमध्ये क्षणचित्रे, किर्तन, प्रवचन, भजन, चरित्र, योगसंग्राम, अभंग, निष्कलंक प्रबोध आदींसह सर्व ग्रंथ वाचण्यास मिळतील अशी माहिती किसन आटोळे सर यांनी दिली.

### उद्या श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग

होऊन पायी दिंडी पिंपळवंडी येथील हनुमान मंदिरासमोर येणारा असून या ठिकाणी भाविक भक्तांसाठी चहा-पाणी नाष्टा दिल्यानंतर सकाळी ११:३० वाजता अंमळनेर कडे मार्गस्थ होणार आहे. अंमळनेर येथे दुपारी १२:३०वाजता श्री गणेश मंदिरात आगमन झाल्यानंतर येथे भाविकांना जेवण देण्यात येणार आहे.व दिंडीचा पहिला मुक्काम पिंपळनेर (जायभाये)येथे होणार आहे.दि.१६ मार्च रविवार रोजी लालपुरी वस्ती पिंपळनेर येथे सकाळी १० ते १२ या वेळेत संत तुकाराम बीज प्रित्यर्थ तुकाराम बिजोत्सव सोहळा होणार व टाकळी येथे मुक्काम.दि.१७ सोमवार रोजी पायी दिंडी जांभळी,सोनोशी मार्गे जाऊन तोंडोळी येथे मुक्कामास थांबेल.दि.१८मंगळवार रोजी पायी दिंडी शिंगोरी,आंतरवाली,बेलगाव येथून जाऊन चापडगाव येथे मुक्काम.दि.१९ बुधवार रोजी गदेवाडी,गर्धेवाडी येथून पायी दिंडी जाणार असून पैठण येथे वाळवंटात मुक्कामी पोहचणार आहे.या पायी दिंडी सोहळ्याच्या मुक्कामी ठिकाणी हरिकिर्तन होणार आहे.

### तीन वर्षापासून पैसे

रुपया पण सुद्धा भरणा केलेला नाही असे पण सांगण्यात आले. पाणीपुरवठ्याचे पैसे भरण्यासंदर्भात ग्रामपंचायतने अगोदरच तरतूद करणे गरजेचे असते पण तसं या ग्रामपंचायतने केलेले नाही असे पण दिसून येत आहे. दरवर्षी शासनाकडून ग्रामपंचायत पाणीपट्टी वसुली करणे गरजेचे असतं पण काही ग्रामपंचायत मनमानी प्रमाणे वसुली करीत नसल्यामुळे याचा परिणाम यावरून दिसून येत आहे.

### शेतकऱ्यांनी ॲग्रिस्टॅक

माहिती पाहता येते, तसेच कृषि विषयक संसाधनाचा वापर योग्य रितीने वापर करणे, प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचा लाभ, हवामान अंदाज, मृदा आरोग्य तपशील आणि योग्य पीक सल्ला मिळतो. तर पीक विमा योजनेचा लाभ सोपा होतो. डिजीटल पीक कर्ज मिळवणे सोपे होते, या करीता सर्व शेतकऱ्यांनी त्यांचे शेतकरी ओळख क्रमांक तयार करुन घेणे आवश्यक आहे.

### जालन्यातील नॅशनल नगर

माहिती मिळाली की, खालेदबीन मोहम्मद बासर रा. कुचरवड्डा जुना जालना ह.मु. ग्रीन पार्क कॉलनी जालना हा त्याचे शाईन मोटारसायकल क्रमांक एम.एच.२१. बी.सी.६१७८ वर धारधार तलवारी घेवुन डांगे नगर भागात, नॅशनल नगर रोडने जाणार आहे. आशी खात्रीशीर माहिती मिळाल्यावरुन सदरची माहिती राजपुत यांना देवुन त्यांचे सुचना व मार्गदर्शन प्रमाणे मिळालेल्या माहितीवरून जाणारे रोडवर पोलीसांनी सापळा रचला सदर इसम हा त्याचे वरिल नमुद मोटारसायकलवर पोत्या मध्ये धारधार तलवारी मोटारसायकलला बांधुन डांगे नगर भागात, नॅशनल नगर कडे येत असताना दिसताच पोलीसांनी सदर इसमास झडप टाकुन पकडले त्यास त्याचे नांव गांव विचारले असता त्यांने त्याचे नांव खालेदबीन मोहम्मद बासर वय ४५ वर्ष रा. कुचरवडा जुना जालना ह.मु. ग्रीन पार्क कॉलनी जालना असे सांगितले. त्याचे ताब्यातून एकुण ०९ धारधार तलवारी किंमती २७०००/- रुपयाच्या व होन्डा शाईन कंपनीची मोटारसायकल किंमती २००००/- रुपयाची असा एकूण ४७०००/- रुपयाचा माल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. अजय कुमार बन्सल, मा. अप्पर पोलीस अधिक्षक आयुष नोपानी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सम्राटसिंग राजपुत, सचिन सानप, एम. बी. स्कॉट, पोहेकों/कृष्णा तंगे, पोहेकों/गजाना जारवाल, नापोकों/राजेंद्र पवार, चालक पोकों/परमेश्वर हिवाळे यांनी केली असुन सदर गुन्ह्याचा तपास पोहेकों/संतोष वनवे करत आहे.

### पहिल्या फेरीत १ हजार

कार्यालयाकडून जाणीवपूर्वक समिती नेमण्यास उशीर करण्यात आला ७ मार्च रोजी त्रि सदस्यीय चौकशी समिती नेमून चौकशी करण्याचे आदेश गटशिक्षणाधिकाऱ्यांनी दिले मात्र चौकशी करण्यासाठी गटशिक्षणाधिकारी कार्यालयाकडून निरुत्साह दाखवण्यात आला त्यामुळे शिक्षण विभागांनी किती बोगस प्रवेश रद्द केले हे मात्र कळू शकले नाही. मात्र आपल्याकडे बोगस प्रवेशाबाबत सक्षम पुरावे असून शिक्षण विभागाने कारवाई न केल्यास आपण ते पुरावे शिक्षणमंत्री, शिक्षण सचिव, संचालक यांच्याकडे सादर करणार असल्याचे शिवसंग्राम चे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी म्हटले आहे.

बोगस प्रवेशाची कारणे

१)निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या काही पालकांनी सादर केलेले कागदपत्र हे पाहता क्षणी बनावट असल्याचे लक्षात येते मात्र निवड समितीतील कर्मचाऱ्यांनी त्याची सखोल तपासणी केली नाही.

२)प्रवेश मिळण्याचे मुख्य मापदंड हे गुगल मॅप वरील अँड्रेस लोकेशन हे आहे. ते तपासणे गरजेचे होते मात्र त्याकडेही दुर्लक्ष करण्यात आले आहे.

३)बनावट आधार कार्ड मोठ्या प्रमाणात सादर केले आहेत. या आधार कार्डची खातरजमा करणे गरजेचे होते. मात्र कसल्याही प्रकारची चौकशी न करता प्रवेश दिले गेले. ४)बोगस कागदपत्रे सादर करणाऱ्या संशयित पालकांच्या घरी कर्मचाऱ्यांनी प्रवेश देण्याआधीच भेट देणे गरजेचे होते मात्र तसेच झाले नाही.

cmyk

# कर्ज़माफीला घाबरता काय, धाडस करा; मुंगटीवारांचा सरकारला घरचा आहेर

मुंबई : भाजीमध्ये मीठ कमी टाकून काटकसर होत नसते. शेतकरी कर्जमुक्तीची डेअरिंग करा, अशी मागणी करत भाजपचे आमदार सुधीर मुंगटीवार यांनी महायुती सरकारला घरचा आहेर दिला. ते विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात बुधवारी बोलत होते. यावेळी मुंगटीवारांनी राज्य सरकारसमोर आरसा धरला. त्यामुळे सत्ताधारी महायुतीची पंचायत झाल्याचं पाहायला मिळाले.

मुंगटीवार म्हणाले, ''शक्तिपीठ महामार्ग झाला पाहिजे. त्यासाठी ८६ हजार कोटींच्या निधीची घोषणा केली. पण त्यापूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासाठी का घाबरता, या कर्जमाफीसाठी २० हजार कोटी रुपये लागणार आहेत. धाडस दाखवा.'' असंही मुंगटीवार म्हणाले. मागील दोन दिवस अर्थसंकल्पावरील चर्चेत विरोधी पक्षांच्या आमदारांनी सरकारला धारेवर धरलं आहे. लाडकी बहीण, शेतकरी कर्जमाफी आणि शक्तिपीठवरून







सत्ताधाऱ्यांवर टिका करण्यात आली. त्यातच मुंगटीवार यांनी सरकारला शेतकरी कर्जमाफीवरून घरचा आहेर दिल्याचं पाहायला मिळाले. मुंगटीवारांनी शेतकरी कर्जमाफीसाठी धाडस करताना कर्मचाऱ्यांच्या वेतनावर होणारा खर्च आणि निवृत्ती वेतन वाढीवरही टिपणी केली. मुंगटीवार म्हणाले, ''शेतकऱ्यांच्या कर्जमाफीला २० हजार कोटी रुपयांची गरज आहे. धाडस दाखवा. कर्मचारी वेतन आणि निवृत्ती वेतनावरील वाढीसाठी एक वर्षात ३० हजार कोटी खर्च करतो. मग शेतकरी कर्जमाफी करण्यास अडचण काय असा सवाल मुंगटीवारांनी उपस्थित केला.

यावेळी मुंगटीवार यांनी मंत्रीपद न मिळाल्याने नाराज नसल्याचे स्पष्ट केले. तसेच मी काहीही बोललो की, हे म्हणतात मंत्री केलं नाही म्हणून नाराज आहे. परंतु असं काही नाही. मी पदासाठी निवडणूक लढवत नाही. तर जनतेच्या सेवेसाठी निवडणून आलो आहे, असं म्हणत तुझसे नाराज नही जिंदगी हैराण हूं मै या हिंदी गाण्याच्या ओळी मुंगटीवार यांनी गाऊन दाखवल्या. दरम्यान, राज्य सरकार अर्थसंकल्पात कर्जमाफीचा निर्णय घेईल, अशी शेतकऱ्यांना अपेक्षा होती. परंतु अर्थमंत्री अजित पवारांनी कर्जमाफीबद्दल ब्र देखील उच्चारला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचा अपेक्षाभंग झाला आहे.

## अतिउष्णतेमुळे ऊस पिकावर 'दुष्काळ' येण्याचा धोका

ऊस हे भारतातील प्रमुख पिकांपैकी एक आहे. साखर आणि इथेनॉल तयार करण्यासाठी देशात उसाची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. अशा परिस्थितीत चांगल्या दर्जाचे उत्पादन घेण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या पिकांचे रोगापासून संरक्षण करणे गरजेचे आहे, जेणेकरून पिकाला योग्य भाव मिळू शकेल. अशाच एका रोगाबद्दल जाणून घ्या, ज्यामुळे तुमचे पीक नष्ट होऊ शकते. अतिउष्णतेमुळे ऊस पिकावर 'दुष्काळ' येण्याचा धोका वाढतो. ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी या रोगाबाबत विशेष काळजी घ्यावी.

उसाचा वरचा भाग सुकू लागतो :दुष्काळी रोगात उसावर कडक सूर्यप्रकाश पडल्याने पिकाचा वरचा भाग सुकू लागतो व ऊस वाढू शकत नाही. या रोगावर वेळीच उपचार न केल्यास संपूर्ण पिकाचे नुकसान होऊ शकते. या रोगापासून ऊस पिकाचे संरक्षण करण्यासाठी सिंचनाबरोबरच औषधांची फवारणी करावी. उसापासून चांगला नफा मिळविण्यासाठी योग्य उत्पादन मिळणे गरजेचे आहे. अशा स्थितीत ऊस पूर्ण विकसित व जाड होणे आवश्यक आहे.या औषधाची फवारणी करा : दुष्काळामुळे उसाची उंची व जाडी वाढणे थांबते व काही वेळाने पीक सुकते. या स्थितीत उसाचे उत्पादन कमी होऊन शेतकऱ्यांचे नुकसान होते. या रोगापासून उसाचे संरक्षण करण्यासाठी पिकाची नियमित काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. तज्ज्ञांच्या मते हा रोग उसाच्या वरच्या भागात दिसल्यास सायंकाळी पाणी द्यावे. २०० लिटर पाण्यात इमिडाक्लोप्रीडचे द्रावण तयार करून त्याची फवारणी उसाच्या पिकावर सायंकाळी दोन वेळा सिंचनासोबत केल्यास पिकातील दुष्काळी रोग दूर होऊन उसाची योग्य वाढ होईल.



## वेलवर्गीय भाजीपाला पिकांसाठी मंडप उभारणीची सोपी आणि प्रभावी पद्धत



शेतावर वेलवर्गीय भाजीपाला पिकांना योग्य आधार देण्यासाठी मंडप उभारणे एक उत्तम उपाय आहे. हा मंडप वेलवर्गीय पिकांना हवामानातील बदल, जास्त पाऊस, किंवा मजबूत वाऱ्यापासून संरक्षण देतो आणि त्यांना वाढण्यासाठी एक मजबूत आधार प्रदान करतो.

मंडप उभारण्याची पद्धत : १. लाकडी डांबांची तयारी - शेताच्या सर्व बाजूंनी प्रत्येक ५ ते ६ फूट अंतरावर १० फूट उंच आणि ४० जाड लाकडी डांब (पोल) जमिनीत गाडावेत. डांब २ फूट जमीन गाडून उभे करावेत. हे पिकांना योग्य आधार देतात आणि हवामानातील बदलांपासून त्यांचे संरक्षण करतात.

२. तारे ताणणे - त्यानंतर, डांबाच्या बाहेरील बाजूस ताणण्यासाठी ८ गेज तारा वापरणे आवश्यक आहे. तारांना १-९.५ फूट लांबीच्या दगडांवर दुहेरी बांधून जमिनीत गाडा. हे तार मजबूतीने ताणले जातात आणि पिकांना अधिक स्थिरता मिळते.

३. यू आकाराचे खिळे ठोकणे - तारे घसरू नयेत यासाठी, डांबावर यू आकाराचे खिळे ठोकून तारा पक्की करावी. यामुळे तार ताणलेल्या स्थितीत राहतील आणि पिकांच्या संरक्षणासाठी अधिक सुरक्षित असतील.

४. पिळाची तारे ताणणे - त्यानंतर, १६ गेज तारे प्रत्येक २ फूट अंतरावर ताणलेल्या तारेवर पसराव्यात. यामुळे मंडप अधिक मजबूत होईल आणि वेलवर्गीय पिकांना सुरक्षा मिळेल.वेलवर्गीय पिकांसाठी मंडप उभारण्याचे फायदे : मंडप पिकांना जास्त पावसापासून, उन्हाच्या तीव्रतेपासून आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवतो. मंडपामुळे पिकांना अधिक स्थिरता मिळते आणि त्यांना योग्य वातावरण मिळवून उत्पादन वाढते. पिकांना ताणलेले तारे योग्य आधार देतात, ज्यामुळे वाऱ्याने किंवा इतर कारणांमुळे पिकांचे नुकसान होणार नाही. मंडप उभारणीची प्रक्रिया साधी आणि जलद आहे. पिकांसाठी योग्य संरचना तयार होण्यास वेळ लागत नाही.निष्कर्ष : वेलवर्गीय भाजीपाला पिकांसाठी मंडप उभारणे हे एक खूप प्रभावी उपाय आहे. योग्य पद्धतीने उभारलेला मंडप पिकांना हवामानाची प्रतिकूल परिस्थिती टाळण्यासाठी आणि त्यांचा विकास योग्य प्रकारे होण्यासाठी खूप मदत करतो. म्हणूनच, आपल्या शेतावर मंडप उभारून आपल्या पिकांना सुरक्षा आणि वाढ देणे एक उत्तम पर्याय आहे. आपल्या शेतात मंडप उभारण्यासाठी आजच पद्धत वापरा आणि आपल्या पिकांसाठी सुरक्षित वातावरण तयार करा.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१९३१ : 'आलम आरा' हा पहिला भारतीय बोलपट मुंबईतील नॉव्हेल्टी चित्रपटगृहात प्रदर्शित झाला.
१९५४ : दिल्ली येथे साहित्य अकादमीची स्थापना झाली.
१९५५ : राजकुमार महेन्द्र हे नेपाल देशाचे राजा बनले.
१९६७ : अमेरीकेचे माजी अध्यक्ष जॉन एफ. केनेडी यांचे पार्थिव आर्लिंग्टन राष्ट्रीय दफनभूमी येथे हलविण्यात आले.
१९७६ : अमेरिकेने नेवादा या ठिकाणी परमाणु चाचणी केली.
१९८८ : जपानमध्ये समुद्रांतर्गत रेल्वे वाहतुकीस प्रारंभ
१९८८ : गणित प्रेमींनी प्रथम पाय डे साजरा केला होता. पाय डे संकल्पना भौतिकशास्त्रज्ञ लॅरी शॉ यांनी १९८८ मध्ये केली होती. (= ३.१४) ही पायाची किंमत दिनांक १४/३ प्रमाणे असल्याचे त्यांच्या लक्षात आले.
१९८८ : प्रथम सोनिया गांधी राष्ट्रीय काँग्रेस पार्टीच्या अध्यक्ष बनल्या.
२००० : कलकत्ता येथील 'टेक्निशियन आय' हा देशातील सर्वात जुना स्टुडिओ आगीच्या भक्ष्यस्थानी पडला.
२००१ : व्ही. व्ही. एस. लक्ष्मणने ईडन गार्डन वर नाबाद २७५ धावा काढून या मैदानावरील सर्वोच्च धावांचा सुनील गावसकरचा विक्रम मोडला. तसेच एका डावात ४४ चौकार मारण्याच्या डॉन ब्रॅडमन यांच्या विक्रमाची बरोबरी केली.
२००१ : चोकिला अय्यर यांनी भारताच्या पहिल्या महिला परराष्ट्रसचिव म्हणून सूत्रे हाती घेतली. त्या सिक्कीममधील आदिवासी समाजातील असून १९६४ च्या बॅचमधील आय. ए. एस. अधिकारी आहेत.
२००७ : कारगिल आणि स्कार्दू यादरम्यान भारत व पाकिस्तान यांच्यात बस सेवा प्रारंभ करण्याबद्दल सहमती झाली.
२०१० : ज्येष्ठ कन्नड साहित्यिक डॉ. एस. एल. भैरप्पा यांच्या हस्ते 'लोकसंस्कृती'चे उपासक आणि संशोधक डॉ. रा. चिं. ढेरे यांना 'पुण्यभूषण पुरस्कार' पुण्यात देण्यात आला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८३३ : पहिली महिला दंतचिकित्सक हॉब्स टेलर यांचा जन्मदिवस.
१८७४ : फिलिप्स इलेक्ट्रॉनिक्स कंपनी चे सहसंस्थापक आंतोन फिलिप्स यांचा जन्म. (मृत्यू: ७ ऑक्टोबर १९५१)
१८७९ : अल्बर्ट आइनस्टाईन नोबेल पारितोषिक विजेते जर्मन-अमेरिकन भौतिकशात्रज्ञ (मृत्यू: १८ एप्रिल१९५५)
१८९९ : इर्विंग ओईल कंपनी चे संस्थापक के. सी. इर्विंग यांचा जन्म. (मृत्यू: १३ डिसेंबर १९९२)
१९०८ : विन्सेंट मोटारसायकल कंपनी चे संस्थापक फिलिप व्हिन्सेंट यांचा जन्म. (मृत्यू: २७ मार्च १९७९)
१९३१ : प्रभाकर पणशीकर ख्यातनाम अभिनेते (मृत्यू: १३ जानेवारी २०११)
१९३३ : मायकेल केन ब्रिटिश अभिनेता
१९६१ : ब्लॅकबेरी लिमिटेड चे संस्थापक माईक लाझारीडीस यांचा जन्म.
१९६३ : ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू ब्रूस रीड यांचा जन्म.
१९६५ : भारतीय चित्रपट सुष्टीतील मिस्टर परफेक्टनिस्ट म्हणून ओळखले जाणारे प्रसिद्ध अभिनेता अमीर खान यांचा जन्मदिन.
१९७२ : भारतीय कवी इरोम चानू शर्मिला यांचा जन्म.
१९७४ : साधना घाणेकर ऊर्फ 'साधना सरगम' पार्श्वगायिका

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८३ : कार्ल मार्क्स, समाजवादी विचारवंत व लेखक
१८८३ : कार्ल मार्क्स जर्मन तत्त्वज्ञ व कम्युनिझमचे प्रणेते (जन्म: ५ मे १८१८)
१९३२ : जॉर्ज इस्टमन अमेरिकन संशोधक व इस्टमन कोडॅक कंपनीचे संस्थापक (जन्म: १२ जुलै १८५४)
१९६३ : भारताचे प्रमुख स्वतंत्रता सेनानी, राजस्थानचे पूर्व मुख्यमंत्री आणि 'भारतीय राष्ट्रीय काँग्रेस' चे प्रसिद्ध नेता जयनारायण व्यास यांचे निधन.
१९९८ : दादा कोंडके अभिनेते, निर्माते, दिग्दर्शक, संवादलेखक (जन्म: ८ ऑगस्ट १९३२)
२००३ : कवी सुरेश भट (जन्म: १५ एप्रिल १९३२)
२०१० : गोविंद विनायक तथा 'विंदा' करंदीकर लेखक, कवी, लघुनिबंधकार व टीकाकार.(जन्म: २३ ऑगस्ट १९१८)
२०१८ : विश्व प्रसिद्ध इंग्रजी भौतिकशास्त्रज्ञ, लेखक तसेच, सिद्धांत कॉस्मोलॉजी सेंटर फॉर रिसर्चचे डायरेक्ट स्टीफन्स हॉकिंग यांचे निधन.

# रासायनिक खतांना उत्तम पर्याय हिरवे खत

शेतीमध्ये होणाऱ्या रासायनिक खतांचा वापर यामुळे हल्ली मानवी आरोग्यावर परिणाम होताना दिसून येतो आहे. विशेषतः कर्करोगासारख्या आजारांना सहज निमंत्रण दिले जात आहे. जमिनी देखील सततच्या रासायनिक खतांच्या माऱ्यामुळे आपली सुपीकता गमावून बसल्या आहेत. जमिनीचा पोत खराब होताना दिसून येतो आहे. अलीकडच्या काही वर्षांमध्ये याकडे गंभीर समस्या म्हणून पाहिले जात आहे. आणि यावर उपाय म्हणून सेंद्रिय खताला प्राधान्य दिले जात आहे. मात्र तरीही कमी कालावधीत अधिक पीक घेण्याच्या नादात बहुतांश रासायनिक खतांचा वापर दिसून येतो आहे. रासायनिक खतासाठीचा पर्याय अगदी सहज उपलब्ध असेल तर त्यांचा वापर नक्कीच कमी होवू शकतो. हिरवे खत हा रासायनिक खतांसाठी एक उत्तम पर्याय आहे. ज्यामुळे लागवडीचा खर्चही कमी येतो. आणि पीकही उत्तम आणि अधिक येते.

हिरवे खत म्हणजे दुसरे तिसरे काही नाही तर वेगाने वाढणारी पाने असणारी पिके होय. अशी पिके फळ येण्यापूर्वी नांगरणी करून जमिनीत दाबली जातात. हिरव्या खतामुळे जमिनीला नायट्रोजन,फॉस्फरस, पोटॅशियम, जस्त/झिंक, तांबे, मँगनीज आणि लोह इत्यादीचा सहज पुरवठा होतो. रासायनिक खतांसाठीच्या पर्यायामध्ये हिरवे खत सहज उपलब्ध करता येणारे, कमी वेळेचे आणि कमी खर्चिक आहे म्हणायला हरकत नाही. शेण, कंपोस्ट, हिरवे खत इत्यादी सेंद्रिय खतांचा वापर रासायनिक खतांना पर्याय म्हणून करता येतो. यापैकी हिरवे खत हे सर्वात सोपे आणि उत्तम साधन आहे. हिरव्या खतामुळे प्रामुख्याने जमिनीची गुणवत्ता सुधारते. पर्यायी जलधारण क्षमता वाढते. जमिनीचा पोत सुधारल्यामुळे जमितीतील विविध घटकांसोबत पिकाच्या उत्तम वाढीसाठी आवश्यक सूक्ष्मजीवांच्या संख्येतही वाढ होते. परिणामी जैविक क्रियांची वाढ होते. या खतांमुळे पिकामधील तण वाढत नाही. हिरवे खत तयार करण्यासाठी वेगाने वाढणारी पिके घ्यावी लागतात. या पीकाची लागवड केल्यानंतर ३०-४० दिवसांनी हे खत मातीत घातले जाते. या पिकांची मुळे खोल तसेच पिकामध्ये वातावरणातील नायट्रोजनचे तर्कसंगत करण्याची क्षमता असणारी असणे देखील खूप गरजेचे असते. तसेच या पिकाची पाणी आणि पोषक द्रव्याची मागणी देखील कमी असणे आवश्यक असते.

खत बनविण्याची पद्धत अगदी सोपी आहे. खतासाठी पेरलेले पीक ३०-४० दिवसांनी जमिनीत मिसळायचे. ते मिसळले की १०-१५ किलो युरिया फवारणी करायची ज्यामुळे रोपांचे विघटन लवकर होते. सूक्ष्मजीव त्याचे विघटन करतात. ज्याचा खत म्हणून पिकाला फायदा होतो. अर्थात पेरणी करण्यापूर्वी हिरवे खत मातीत घालायचे असते. हिरवे खत अधिक खोलवर मिसळू नये कारण हे पोषक तत्वांना खूप खोलवर दडपते. शेतात एका विशिष्ट टप्प्यावर पीक पलटी केल्यास तुम्हाला जास्तीत जास्त नायट्रोजनचा फायदा होतो. मसूर, मूग, उडीद, गवार, लोबिया इत्यादी पिके हिरव्या खतासाठी वापरली जातात.



# लिंबागणेश येथे महाबोधी विहार मुक्तीसाठी निदर्शने

## बौद्ध विहाराचे नियंत्रण आणि व्यवस्थापन बौद्ध भिक्खुंच्या ताब्यात द्यावे



लिंबागणेश । प्रतिनिधी

बिहार राज्यातील बोधगया येथील महाबोधी बौद्ध विहार कायदा बीटीएमसी अक्ट १९४९ रद्द करून महाबोधी बौद्ध विहाराचे संपूर्ण नियंत्रण आणि व्यवस्थापन बौद्ध भिक्खुंच्या ताब्यात देण्यात यावे या प्रमुख मागणीसाठी डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१३ गुरूवार रोजी सकाळी पंचशील नगर येथे तथागत गौतम बुद्ध आणि महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करून गावातील प्रमुख चौकातुन घोषणाबाजी करत रॅली काढण्यात आली. गावच्या मुख्य प्रवेशद्वारात निदर्शने करण्यात आली.

बिहार मधील महाबोधी बौद्ध विहार जागतिक वारसा स्थान म्हणून ओळखले जाते. शाक्य वंशाचे राजकुमार सिद्धार्थ गौतमांना या ठिकाणी पुर्णज्ञान (संबोधी /बुद्धत्व ) प्राप्ती होऊन ते सम्यक संबुद्ध बनले व' बुद्ध 'म्हणून सर्वत्र ओळखले जाऊ लागले.तथागत गौतम बुद्धाला ज्या बोधी वृक्षाखाली ज्ञानप्राप्ती झाली.तो बोधीवृक्ष याच महाबोधी महाविहार परिसरात आहे.त्यामुळे देशातील नव्हे तर जगभरातील बौद्ध अनुयायी भिक्खु आणि पर्यटक या स्थळाला भेट देतात.मात्र आजही या महाविहाराचे नियंत्रण आणि व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात नाही. तेथील बौद्ध विहाराचा ताबा सनातन ब्राह्मणांच्या ताब्यात असून ज्या रुढी परंपरांना गौतम बुद्धांनी नाकारले तीच कर्मकांडे येथे सुरू आहेत.बिहार येथील बौद्धगया महाबोधी महाविहार कायदा बीटीएमसी ऍक्ट १९४९ त्वरित रद्द करून सदरील बौद्ध विहार बौद्ध भिकूंच्या ताब्यात देण्यात यावे. बिहार राज्यात उपरोक्त कायद्याप्रमाणे बौद्धगया येथील महाबोधी महाविहार यांचे संपूर्ण व्यवस्थापन ब्राह्मण पुजाऱ्याकडे असून हा कायदा १९४९ मध्ये बिहार राज्य अंतर्गत स्थापित झालेला असून संविधानिक अधिकारानुसार (अनुच्छेद २५ आणि २६ )प्रमाणे आणि संविधानाच्या अनुच्छेद १३ विरोधात आहे हा विरोधाभास संपुष्टात आणून संविधानाचे बुज राखून महाबोधी महाविहाराचे संपूर्ण व्यवस्थापन बौद्ध भिकूंच्या ताब्यात देण्यात यावो. अशी मागणी करण्यात आली.भिम टायगर ग्रुपचे बीड जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ, ,भिमराव जाधव यांनी मनोगत व्यक्त केले.आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव,राजाभाऊ गिरे ,बाळकृष्ण थोरात, सुरेश निर्मळ,श्रीहरी निर्मळ, अँड . गणेश वाणी,दादा गायकवाड,बीड उपजिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना आरूण निर्मळ, जितेंद्र निर्मळ, उमेश थोरात, दादा थोरात, नितीन थोरात, श्रीकांत आवसरे, नितिन निर्मळ, नाना निर्मळ, सिद्धार्थ निर्मळ, अमोल वक्ते , तुकाराम गायकवाड, प्रमोद निर्मळ, बबन सोनावणे, भालचंद्र गिरे, गणपत तागड, सचिन गिरे, आदि सहभागी होते.

# आ. सुरेश धस यांच्या मागणीचे कोळवाडी गावकऱ्यांकडून स्वागत

## ग्रामसभेत ठराव घेणार : अमलबजावणीची सरकारकडून अपेक्षा

शिरुर । प्रतिनिधी

वेगवेगळ्या अडचणीला समारे जावे लागत आसल्याने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून करण्यात येत असलेल्या वैयक्तिक योजनांचे पैसे थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर द्यावेत अशी मागणी मागणी आमदार सुरेशअण्णा धस यांनी केली आहे. या मागणीचे कोळवाडी (ता. शिरुर कासार) गावकऱ्यांनी स्वागत केले आहे. या मागणीचा सरकारने तातडीने विचार करुन निर्णय घेण्याबाबत ग्रामसभेत ठराव घेणार आहेत.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून सिंचन विहीरी, गायगोठे, शेततलाव, फळबाग लागवड आदींसह अनेक वैयक्तिक लाभाच्या योजना राबवल्या जात आहेत. त्यासाठी जॉबकार्ड असलेले मजुर या योजनेच्या कामावर असणे बंधनकारक आहे. दर आठवड्याला मस्टर काढले जातात. मात्र या योजनेचा लाभ घेताना लाभार्थ्यांना सरपंच, ग्रामरोजगार सेवक, सबंधित विभागाचा अभियंता, आदीच्या मनमानीमुळे अडचणीला समोरे जावे लागत आहे. संपुर्ण योजनेचा लाभ होईपर्यत अडवणूक आणि आर्थिक नुकसान होत असल्याने सबंधित योजनेचा निधी थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर द्यावा अशी मागणी आष्टी-पाटोदा-शिरुर कासारचे आमदार सुरेशणअणा धस यांनी विधानसभेत केली आहे. या मागणीचे कोळवाडी (ता. शिरुर कासार) गावकऱ्यांनी स्वागत केले आहे. सुरेश अण्णा धस यांनी केलेली मागणी रास्त आणि शेतकऱ्यांच्या दृष्टीने फायदेशीर आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील वैयक्तीक लाभाच्या योजनांचा संपुर्ण निधी थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर दिला तर अनेक अडचणी दुर होतील. त्यानंतर सबंधित शेतकरी मजुरांना त्यांच्या मजुरीचे सरकारी नियमाने पैसे देतील. त्यामुळे या निर्णय़ाची सरकारने अमलबजावणी करावी यासाठी कोळवाडी ग्रामपंचायत ग्रामसभेत तसा ठराव घेऊन सुरेश अण्णा धस यांच्या मागणीला पाठिंबा देत अमलबजावणी करण्याची मागणी सरकारकडे करणार आहे. आमदार सुरेश अण्णा धस यांनी केलेल्या मागणीचे गावकऱ्यांनी स्वागत केले आहे.

# संतांनी सामान्य जणांसाठी धर्म सोपा करुन दिला-उबाळे

## संत तुकाराम महाराज मंदिर तळेगाव येथे बीजसोहळ्यानिमित्त चौथे कीर्तन



बीड । प्रतिनिधी

सर्व संतांनी सामान्य जणांसाठी धर्माचे सर्व दरवाजे खुले केले. ज्यांना धार्मिक क्षेत्रामध्ये कुठलाही अधिकार नव्हता त्यांना अधिकार देण्याचे महान कार्य संतांनी केल्याचे प्रतिपादन ह.भ.प.श्रीकृष्ण महाराज उबाळे यांनी केले. तळेगाव येथील जगद्गुरु संत तुकाराम महाराज मंदिर आयोजित बीज सोहळ्याच्या निमित्ताने चौथ्या दिवशीच्या कीर्तनामध्ये ते बोलत होते. त्यांनी कीर्तनाच्या निरोपणासाठी 'पुण्य परउपकार पाप ते परपीडा आणिक नाही जोडा दुजा यासी ' हा संत तुकाराम महाराजांचा अभंग घेतला होता.

पुढे बोलताना ते म्हणाले की, संतांनी सामान्य जणांना सोप्या पद्धतीचे विविध धार्मिक मार्ग तयार केले. नामस्मरण, अभंग, ओवी, पंढरीची वारी, हरिपाठ, काकडा भजन, कीर्तन हे सर्वसामान्य लोकांच्या आवाक्यातील साधने तयार केली. पुरुष, स्त्री, शूद्र, अतिशूद्र, चांडाळ अगदी वेश्या यांना सुद्धा धार्मिक क्षेत्रामध्ये मान्यता देणारी ही साधन आहेत. गरजू लोकांवर मदत करणे हे खरे पुण्य तर इतरांना त्रास देणे हे पाप. सात्याने, नीतीने वागणे हा धर्म, असत्याशी, अनितीशी संग करणे हा अधर्म. नाम चिंतन करणे आणि शुद्ध होणं ही अध्यात्मिक क्षेत्रातील प्रगती यापासून दूर जाणे ही अधोगती, संत सज्जनांच्या, संत साहित्याच्या सहवासात राहणं हा स्वर्गवास तर त्यापासून दूर जाणे हा मूर्खपणा. या पद्धतीने त्यांनी संत तुकाराम महाराज यांच्या अभंगावर निरूपण केले. या कीर्तनासाठी ह.भ.प. त्रंबक महाराज मातकर, संतोष महाराज डोंगरे, भाऊसाहेब महाराज धांडे, दत्तात्रय महाराज बहिर, राजाराम महाराज घोलप, अमोल महाराज, मच्छिंद्र महाराज गोरे, आचार्य सुधाकर शिंदे, अभिमन्यू उबाळे, वाव्हळ, सचिन पवळ यांच्यासह काकडहिरा, तळेगाव, बीड, पालवन, गवळवाडी व पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संचमान्यतेच्या विरोधात शिक्षक समितीचे धरणे आंदोलन

बीड । प्रतिनिधी

दिनांक १५ मार्च २०२४ च्या संच मान्यतेच्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र शासनाने नवीन संचमान्यता धोरण लागू करण्याचे ठरवले आहे हा शासन निर्णय शिक्षण व्यवस्थेवरती दूरगामी परिणाम करणार आहे त्यामुळे १७ मार्च रोजी बीड जिल्ह्यासह संपूर्ण राज्यांमध्ये आंदोलनाची भूमिका महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने राज्य कार्यकारणी मध्ये घेतली आहे त्यानुसार बीडला सोमवार १७ मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार आहे अशी माहिती राज्य संघटक राजेंद्र खेडकर यांनी दिली आहे शिक्षक समितीची जिल्हा कार्यकारणी बैठक नुकतीच झाली यावेळी राज्य संघटक राजेंद्र खेडकर विभाग मार्गदर्शक दिलीप खाडे राज्य कार्यकारणी सदस्य अशोक धोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक संपन्न झाली.

या बैठकीत शासनाने शाळा बंद करण्याचे पाऊल थेट उचलले तर समाजातून आरडाओरड होईल त्यामुळे गरज नसताना संच मान्यतेच्या नवीन निकषानुसार शिक्षण क्षेत्राला कोंडीत पकडून शिक्षक संख्या कशा पद्धतीने कमी होईल व भविष्यात शिक्षक भरती होणार नाही या दृष्टीने नवीन संच मान्यतेचे धोरण राबवले जात असल्याची भावना समस्त शिक्षक वर्गामध्ये तयार झाली आहे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा या निर्णयामुळे मोडकळीस येणार आहेत पर्यायाने गोरगरीब बहुजनांची मुले शिक्षणापासून वंचित राहणार आहेत पहिली ते चौथीसाठी ६१ पटाला तीन शिक्षक पूर्वी होते ते आता ७६ पट आला तीन शिक्षक असे धोरण केले आहे सहावी ते आठवीला वीस पेक्षा कमी विद्यार्थी असतील तर एक शिक्षक मिळणार आहे यामुळे या वर्गांना शिक्षक कमतरता असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे भविष्यात वर्ग बंद पडण्याची भीती निर्माण झाली आहे या शासन निर्णयामुळे हजारो शाळा व किमान १६०००ते १८००० शिक्षक तसेच मुख्याध्यापकांची पदे सुद्धा अतिरिक्त ठरणार आहेत हा नवीन शासन निर्णय मराठी शाळांचे अस्तित्व व गोरगरिबांचे शिक्षण धोक्यात आणणार असल्यामुळे हा शासन निर्णय त्वरित रद्द करावा अशी शासनाकडून अपेक्षा आहे ही भूमिका सर्व पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आली याकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी १७ मार्च रोजी संपूर्ण राज्यभर जिल्हाधिकारी कार्यालय समोर अन्यायकारक संच मान्यता धोरणा विरुद्ध धरणे निदर्शने सत्याग्रह आंदोलन केले जाणार आहे या आंदोलनात बहुसंख्य शिक्षकांनी सहभागी व्हावे असे आवाहन महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती जिल्हा शाखा बीडच्या वतीने जिल्हाध्यक्ष महेश सातपुते,जिल्हा सरचिटणीस सुरेंद्र गोल्हार,जिल्हा नेते वजीर शेख,जिल्हा प्रसिद्धीप्रमुख योगेश सोळसे, जिल्हा सल्लागार एस के सानप,जिल्हा कार्याध्यक्ष लहू पवार,जिल्हा कोषाध्यक्ष विष्णू झोंबाडे,जिल्हा उपाध्यक्ष मधुकर सानप,पुरुषोत्तम काटुळे,शिक्षक नेते गोरक्षनाथ मिसाळ,जुनी पेन्शन आघाडी समन्वयक राहुल उंडाळे व विठ्ठल पवार,विशाल कुलकर्णी,केशव बादाडे,रत्नाकर फड, बाबुराव फड, अर्जुन मुंडे, राहूल काकनाळे,सुंदर डोंगरे,भाऊसाहेब बांगर, कैलास शेकडे,अनंत सानप यांनी केले आहे

# लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला दिवसाच कुलुप



लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्रावर लिंबागणेश पंचक्रोशीतील १४-१५ गावातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील लोक आरोग्य सेवेच्या दृष्टीने अवलंबून आहेत. खाजगी दवाखान्याचा अवाजवी खर्च पेलु न शकणाऱ्या गोरगरीब रुग्णांना आधार वाटतो. मात्र वैद्यकीय अधिकारी यांच्या हलगर्जीपणामुळे रूग्णांची हेळसांड झाल्याचे दिसून येत आहे.

आज दि.१३ गुरुवार रोजी लिंबागणेश येथील आठवडे बाजार असुनही दुपारीच प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय तपासणी कक्षाला कुलुप आढळून आले. गावातील सामाजिक कार्यकर्ते विक्रांत वाणी यांनी २-३ वेळा वैद्यकीय अधिकारी यांना फोन केला परंतु उचलण्यात आले नाही. तिसऱ्यांदा केलेला फोन उचलल्यानंतर मी बघते ,सांगते असं उत्तर वैद्यकीय अधिकारी डॉ.रूपाली चिटकुलवार यांनी बीडहुन निघाल्याचे सांगितले. याचवेळी ज्येष्ठ नेते जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या शाळेवरील कर्मचाऱ्यांने विक्रांत वाणी यांना फोन करून वैद्यकीय अधिकारी जयदत्त आण्णांच्या जवळच्या असुन विषय वाढवु नका, बातमी करू नका असा अनाहुत सल्ला दिल्याचे विक्रांत वाणी यांनी सांगितले. रूग्णांनी पत्रकारांना समस्या सांगताच प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांने आकांडतांडव करत रूग्णांनाच ४ गोष्टी ऐकवल्या त्यामुळे रूग्णांचे नातेवाईक संतप्त झाले होते. प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी आलेले भिवाबाई येडे, प्रमोद येडे, प्रमोद निर्मळ यांनी दवाखान्यात येऊन चिठ्ठी काढली आहे.परंतु डॉक्टरांचा पत्ताच नसल्याने नाराजी व्यक्त केली.

# स्टेट बँक इंडिया आपल्या दारी चौसाळा शाखेचा उपक्रम

## बोरखेड येथे ग्राहक मेळावा

चौसाळा । प्रतिनिधी

भारतीय स्टेट बँक चौसाळा तसेच भारतीय स्टेट बँक कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्या सौजन्याने स्टेट बँक आली तुमच्या दारी या कार्यक्रमांतर्गत आज दिनांक १२ मार्च २०२५ होळीच्या पवित्र दिवशी अतिशय भव्य असा ग्रामस्थ शेतकरी संवाद बचत गट महिलांची निगडित असलेल्या योजना, जनधन खाते योजना व सामाजिक सुरक्षा विमा योजना तसेच वैयक्तिक योजना मेळावा, इत्यादी विषयावर सखोल मार्गदर्शन भारतीय स्टेट बँकेचे मुख्य प्रबंधक श्री अतुल सावजी वित्तीय विपणन विभाग आंचलिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर, यांच्यातर्फे करण्यात आले शासनाच्या विविध योजना तसेच शेतकरी वर्गाचा सर्वांगीण विकास बचत गटासाठी उद्योग धंद्या संदर्भात असलेल्या विविध योजना व त्याविषयीचे सखोल मार्गदर्शन तसेच सामाजिक बांधिलकी जोपासणे व इतर विधायक कामे करण्यासंदर्भात अतिशय मोलाचे मार्गदर्शन श्री अतुल सावजी यांनी भारतीय स्टेट बँकेच्या वतीने स्टेट बँक आली तुमच्याद्वारे या कार्यक्रमात आज बोरखेड येथे केले.

सर्व ग्रामस्थ मंडळींनी भारतीय स्टेट बँकेत स्वतःचे बचत खाते उघडावे लाडक्या बहिणींनी दहा वर्षाखालील मुलींसाठी सुकन्या समृद्धी योजनेमध्ये आपले खाते उघडावे तसेच कुटुंबाचा संरक्षण करण्यासाठी विम्याच्या विविध योजना गुंतवणुकीचे विविध पर्याय तसेच अटल पेन्शन योजना पंतप्रधान सुरक्षा विमा योजना व पंतप्रधान जीवन ज्योती जमा योजना या सर्व योजनांविषयी सखोल माहिती आजच्या या कार्यक्रमाच्या निमित्ताने भारतीय स्टेट बँकेच्या वतीने आज बोरखेड येथे देण्यात आली, कार्यक्रमासाठी संपूर्ण बोरखेड येथील ग्रामस्थ मंडळी तसेच सरपंच फुलाबाई रोहिदास पवार उपसरपंच सुनील अनपट गावातील प्रतिष्ठित मंडळी विजय कवडे निवृत्त माजी सैनिक तसेच अरुण काकडे , आत्माराम शिंदे, विनोद साठे, व इतर शेतकरी मंडळी तसेच महिला बचत गट सदस्य शेतमजूर व ग्रामस्थ यांची उपस्थिती कार्यक्रमाला लाभली.

भारतीय स्टेट बँकेतील चौसाळा येथील डेप्युटी मॅनेजर जयश्री पडळकर मॅडम यांचे मोलाचे सहकार्य आजचे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लाभले तसेच भारतीय स्टेट बँकेचे चारही ग्राहक सेवा केंद्र प्रमुख बालाजी वैष्णव विकास सर्वज्ञ निलेष जोगदंड यांचे कार्यक्रमाला मुख्य उपस्थिती होती या कार्यक्रमाच्या निमित्ताने आज रोजी ८० जनधन खाते उघडण्यात आले तसेच येणाऱ्या काळामध्ये कमीत कमी पाचशे बचत खाते या गावातून भारतीय स्टेट बँकेच्या चौसाळा शाखेमध्ये उघडण्यात येतील, आजच्या या कार्यक्रमाच्या निमित्ताने बोरखेड येथील ग्रामस्थ मंडळी व भारतीय स्टेट बँक यांचे नवीन नातेसंबंध खाते उघडून झाले आहेत येणाऱ्या काळामध्ये भारतीय स्टेट बँकेच्या विभिन्न योजनांचा फायदा घेऊन बोरखेड ग्रामस्थ मंडळी आपला स्वतःचा वैयक्तिक विकास तसेच गावाची प्रगती साधतील अशी अपेक्षा श्री अतुल सावजी यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केली आहे.


## जाहीर प्रगटन

**मा. विशाखा बी.पाटील ६वे सह. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नंबर ४३३/२०२५**

**कचराबाई अंबादास मातकर विरूध्द निरंक**

अर्जदार : १ कचराबाई अंबादास मातकर, वयः ७० वर्षे, धंदा घरकाम, रा. बाभळवाडी पो. पिंपळनेर ता. जि. बीड., २ सुंदर भ्र. लिंबाजी सातपुते, वयः ५३ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे. ३ रंजना भ्र. पुसाराम दरेकर, वयः ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. मोरेवाडी पो. कवडगाव ता. वडवणी, जि. बीड. ४ मारुती पि. अंबादास मातकर, वयः ४६ वर्षे, धंदा शेती, रा. बाभळवाडी, पो. पिंपळनेर ता. जि. बीड.

विरुध्द निरंक

मागणी : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत अंबादास तुकाराम मातकर रा. बाभळवाडी, पो. पिंपळनेर ता. जि. बीड. यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी अंबादास तुकाराम मातकर रा. बाभळवाडी, पो. पिंपळनेर ता. जि. बीड. मृत्यु दि. १६/१२/२०२४, रोजी घरी बाभळवाडी, येथे मयत झालेले असून अर्जदार क्र. १ ही मयत अंबादास तुकाराम मातकर यांची पत्नी आहे. अर्जदार क्र २ व ३ या त्यांच्या मुली, अर्जदार क्र ४ हा त्यांचा मुलगा आहे.

वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्कावदद्ल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू मयत अंबादास तुकाराम मातकर रा.. बाभळवाडी, पो. पिंपळनेर ता. जि. बीड. यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक ०७ माहे ०३ सन २०२५ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १६/०४/२०२५ आहे.**

स्वाक्षरित **क लिपीक** (शिक्का) आदेशावरून स्वाक्षरित **अधिक्षक** दिवाणी न्यायालय व. स्तर बीड


# चिमुकल्यांनी केली रंगांची उधळण



मंठा । प्रतिनिधी

शाळा हे ज्ञानासोबतच आनंद मिळण्याचे उत्तम ठिकाण असून लहान वयात विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लग्ण्यासाठी विविध उपक्रम राबविणे आवश्यक असते. असाच आनंददायी उपक्रम पाटोदा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत होली व धुलीवंदनानिमित्त १३ मार्च रोजी राबविण्यात आला. विद्यार्थ्यांना रंगांचे महत्त्व पटवून दिल्यानंतर रंगांची मुक्त उधळण करण्यास मुभा दिली. विद्यार्थ्यांनी एकमेकांसोबत रंगांची उधळण करीत मनसोक्त आनंद घेऊन गोडधोड पदार्थांचा शाळेत अस्वाद घेतला. चिमुकल्यांनी केलेली ही रंगाची उधळण त्यांच्या कायम स्मरणात राहील हे मात्र नक्की ! मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सर्व सदस्यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक शिक्षक गंगाधर वानोळे व सहशिक्षिका गीता बरसाले यांनी नियोजन केले होते.


जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/२९
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- २४/०१/२०२५

नाव बदलण्याचा

## जाहिरनामा

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १)संजय गोरखनाथ लेकुरवाळे, २) राम ओमप्रकशा पाटेकर, सर्व्हे नं. ३३ सि.स.नं. २९९३ सहन प्लॉट नं. ३७ व सहन प्लॉट नं. ३८ चे वारसा अधारे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. () दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- ६ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
पश्चिम :प्लॉट नं. ४२ व ४३
दक्षिण- प्लॉट नं. ३६
उत्तर : प्लॉट नं. ३९

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड


# अमोल सातपुते यांना रजत पदक



बीड । प्रतिनिधी

पुणे जिल्ह्यातील जुन्नर येथील उपवन संरक्षक अमोल सातपुते यांनी बीड जिल्ह्यात वन अधिकारी म्हणून काम करतांना २०२० ते २१ मध्ये केलेल्या वनसंरक्षणाच्या प्रभावी कामाबद्दल राज्याच्या वन विभागाने रजत पदक जाहीर केले आहे.

बीड जिल्ह्यात सन २०१६ ते २०२१ मध्ये जिल्हा वन अधिकारी म्हणून अमोल सातपुते हे कार्यरत होते. या काळात जिल्ह्यातील २७० एकर वन क्षेत्रातील अतिक्रमण हाटवुन येथे पुन्हा वनीकरण केले होते. त्याच बरोबर जिल्ह्यातील ५० ठिकाणच्या ११० एकर क्षेत्रात मियावाकी पध्दतीने घनदाट वनांची निर्मिती करून तेथील स्थानिक जैवविविधता संवर्धनाचा यशस्वी प्रयत्न केला होता. वृक्षारोपण संगोपनासाठी दुष्काळी बीड जिल्ह्यातील २७ ठिकाणी फिरत्या सौर ट्रॉली तंत्राचा वापर करून ग्रीन बेल्टची निर्मिती केली होती. त्याच बरोबर बीड जिल्ह्यातील वनक्षेत्रात वन्यजीवांसाठी ३ वर्षात १२० पाणवठे तयार केले व शिकारीवर लक्ष ठेवण्यासाठी जिल्ह्यात प्रथमच कॅमेरा ट्रॅपचा वापर केला.वन विभागाकडून राज्यात वनसंपत्तीचे सरंक्षण व संवर्धनाचे काम प्रभावीपणे करणाऱ्या अधिकाऱ्यांचे मनोधैर्य वाढवण्यासाठी व त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल प्रोत्साहीत करण्यासाठी राज्यस्तरावरून पदके दिली जातात.या पदकासाठी सध्या जुन्नर येथे कार्यरत असलेले अमोल सातपुते यांची राज्यस्तरीय पदक निवड समितीने रजत पदकासाठी निवड केली आहे. या निवडीबद्दल उपवन संरक्षक अमोल सातपुते यांचे अभिनंदन होत आहे.

# तलावातून अवैध पाणी उपसा ;कारवाई कोण करणार?

## बेसुमार पाणीउपसा : मार्चमध्येच जाणवू लागल्या पाणीटंचाईच्या झळा

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यामध्ये दोन मध्यम प्रकल्प आणि चार लघु प्रकल्प आहेत तसेच अनेक गावांमध्ये गाव तलाव पाझर तलाव ही आहेत पाझर तलावातील पाणी पंधरा दिवसच पुरेल एवढाच पाणीसाठा राहिलेला आहे यावर्षी समाधानकारक पाऊस झाला असला तरीही मध्यम प्रकल्प सोडता लघु प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरलेले नव्हते अशातच तिगाव,साळींबा चिंचोटी,मामला या लघु प्रकल्पांमधून बेसुमार पाणी उपसा सुरू असून यामुळे पाणीटंचाईच्या झळा मार्चमध्ये जाणवणार आहेत तिगाव साळींबा चिंचोटी मामला या तलावामध्ये विद्युत मोटार मोठ्या प्रमाणावर आहेत असे असताना देखील याकडे वडवणी तहसील प्रशासन आणि संबंधित विभाग दुर्लक्ष करत असून लघु प्रकल्पांमध्ये महिनाभर पुरेल इतकाच पाणी साठा शिल्लक असताना देखील अवैध पाणी उपसा करणाऱ्या वर कुठलीच कारवाई होत नसल्याने यावर्षी तालुक्याला पाणीटंचाईच्या तीव्र झळा सोसाव्या लागणार आहेत.तसेच या तलावातून अवैध पाणी उपसा करण्यासाठी विज चोरून वापरली जात असल्याचे दिसत आहे एका विद्युत पोल वर २५ ते ३० आकडे टाकलेले असताना देखील विद्युत विभाग देखील विज चोरी करणाऱ्या वर कारवाई करत नसल्याने वडवणी तालुक्यात मोठ्या प्रमाणावर अवैध पाणी उपसा सुरू आहे.

**लवकरच एक पथक तयार करून ज्या ठिकाणी अवैध पाणी उपसा चालू आहे अशा ठिकाणी कारवाई करण्यात येईल तसेच अवैध पाणी उपसा करणारे मोटर ही जप्त करण्यात येतील**
**वैभव महेंद्रीकर,तहसीलदार वडवणी**



### विहीर बोअरचे पाणी आटू लागले

वडवणी तालुक्यातील पाणी पातळी दिवसे न दिवस खोलवर जात असून यावर्षी फेब्रुवारी महिन्यातच विहीर बोअर ची पाणी पातळी खालावली असून अनेक विहिरीनी तळ गाठला असून बोअर देखील बंद पडू लागले आहेत. त्यामुळे यावर्षी वडवणी तालुक्यातील नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागणार आहे



### कारवाई कोण करणार?

तालुक्यातील सर्वच तलावातून अवैधरित्या पाणी उपसा सुरू असताना देखील याकडे वडवणी तहसील प्रशासन विद्युत विभाग आणि या तलावाचे संबंधित विभाग हे तीनही विभाग कारवाई करत नसल्याने तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर अवैध पाणी उपसा सुरू आहे.

# आयशर-दुचाकीच्या आपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मुत्यू

माजलगाव । प्रतिनिधी


शहरापासून जवळच असलेल्या फुले पिंपळगाव शिवारात माजलगाव -गढी या राष्ट्रीय महामार्गावरील सौभाग्य मंगल कार्यालयासमोर आयशर व दुचाकीच्या आपघातात २६ वर्षीय तरुणाचा जाग्यावरच मुत्यू झाल्याची दुर्दैवी घटना दि १२ मार्च बुधवार रोजी सायंकाळी ६;०० वाजण्याच्या सुमारास घडली.

माजलगाव तालुक्यातील सुर्डी नजिक तांडा येथील रहिवासी असलेला गोपाळ रूपसिंग पवार हा युवक माजलगाव शहरापासून जवळच असलेल्या ब्रह्मगाव येथुन आपल्या मित्राला भेटून आपल्या गावी सुर्डीला जात होता.केसापुरी वसाहत जवळ असलेल्या सौभाग्य मंगल कार्यालयासमोर आयशरला धडक झाल्याने झालेल्या गंभीर आपघातात दुचाकीवरील तरुण जागीच पडल्याने त्याच्या डोक्याला जबर मार लागून मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना दि १२ मार्च बुधवार रोजी सायंकाळी ६:०० वाजण्याच्या सुमारास घडली आहे.आपघातातील मुत्यु झालेल्या तरूणास नागरिकांनी माजलगाव ग्रामीण रुग्णालयात आणले असता डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले.मयत गोपाळ पवार याच्या पाश्चात पत्नी,एक मुलगा, आई वडील असा परिवार आहे. त्याच्या झालेल्या अपघाती मृत्यूमुळे सुर्डीनजीक परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# जालन्यातील नॅशनल नगर भागात ९ तलवारी जप्त

जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील नॅशनल नगर भागात १३ मार्च रोजी होळी धुलीवंदन सणा निमित्त जालना पोलीस ठाणे चंदनझिरा येथील पोलीस निरीक्षक सम्राटसिंग राजपुत यांच्या सुचने प्रमाणे पोलीस उपनिरीक्ष सचिन सानप, एम.बी. स्कॉट, पोहेकों/तंगे, पोहेकाँ / जारवाल, नापोकों/राजु पवार, चालक पोकों/हिवाळे असे चंदनझिरा भागात पेट्रोलिंग करीत असताना सचिन सानप यांना त्यांच्या खबऱ्या मार्फत



पान ३ वर

# तीन वर्षापासून पैसे न भरल्यामुळे मार्डीचा पाणीपुरवठा बंद

अंबड । प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील मार्डी या गावांतर्गत मार्डी शिवारातील शासनाच्या धरणात विहीर असून त्या विहिरी मधून मार्डी गावाला पाणीपुरवठा करण्यात येतो सदरील मार्डी ग्रामपंचायत शिवसेनेच्या ताब्यात आहे. परंतु या ग्रामपंचायत मार्फत कोणतीही वसुली करण्यात येत नसून यामुळे पाटबंधारे विभागाचे ८९ हजाराची थकीत रक्कम झाली आहे. ग्रामपंचायत वसुली करीत नसल्यामुळे रक्कम वाढल्याचे दिसून येत आहे. यासंदर्भात पाटबंधारे विभागाचे उपअभियंता शाखा अभियंता यांच्यामार्फत १५ दिवसापूर्वी मार्डी ग्रामपंचायतला पैसे भरण्यासंदर्भात नोटीस देण्यात आलेली आहे परंतु सदरील ग्रामपंचायत ने नोटीस च्या विचार ना केल्यामुळे पाटबंधारे विभागाने दिनांक ११ मार्च रोजी सदरील विहिरीवरील साहित्य जप्त करून मार्डी गावाचं पाणी बंद करण्यात आले. या संदर्भात शाखा अभियंता पवार मॅडम यांना विचारले असता ते म्हणाले की आम्हाला जलसंपदा खात्याचे मंत्री यांच्याकडून वसुली करण्यासंदर्भात आदेश आहे. त्या आदेशावरून आम्ही आमच्या शासनाच्या नियमाप्रमाणे वसुली करीत आहे . तसेच त्या म्हणाले की तीन वर्षापासून मार्डी ग्रामपंचायत ने एक

# मोबाईलच्या जमान्यात तरुणाईला संस्काराची गरज : इंदुरीकर महाराज

म्हसोबावाडी (प्रतिनिधी)

सध्याची तरुणाई मोबाईलमध्ये अडकली असून तरुण मुलं मोठ्या प्रमाणात व्यवसनाच्या आहारी जाताना दिसतात. त्यांना संस्कार करण्यात पालक कमी पडतात, म्हणून लहानपणीच मुलांना संस्कार होणे गरेजेचे आहे असे प्रतिपादन निवृत्ती महाराज देशमुख यांनी केले.

तालुयाती श्रीक्षेत्र वाहिरा येथे संत शेख महंमद महाराज पुण्यतिथी निमित्त यात्रा उत्सव मोठ्या प्रमाणात भरतो या यात्रा उत्सवाच्या किर्तन प्रसंगी इंदुरीकर महाराज बोलत होते. यावेळी संत शेख महंमद महाराजांचे वंशज ह.भ.प. जब्बर महाराज शेख, ह.भ.प. सोमनाथ मेटे महाराज, सुखदेव महाराज झांजे, सरपंच संभाजी गाडे, सिद्धनाथ मेटे, संजय पगारे, उपसरपंच योगेश झांजे, प्रा. दादासाहेब झांजे, पोलीस पाटील शिवाजी झांजे, भाऊसाहेब झांजे, आण्णा आटोळे, फकड झांजे, प्रा. सिताराम झांजे, दगडू शेख, महंमद शेख आदींसह पंचक्रोशितील ग्रामस्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.सकाळी ७ वा. महाआरती होऊन यात्रा उत्सवास सुरुवात झाली. संत शेख महंमद महाराज यांची संपुर्ण माहिती असलेल्या वेबसाईटचे उद्घाटन



पान ३ वर

# नाट्य गृहासाठी पाच कोटी रुपयाचा निधी मंजूर

## खासदार बजरंग सोनवणे व मोहनराव जगताप यांच्या प्रयत्नाला यश-माजी नगरसेवक शरद यादव

माजलगाव । प्रतिनिधी

शहरात नाट्यगृह असावे अशी रसिक प्रेमींची भावना होती. तसेच अनेक महाराष्ट्रातील नामवंत कलाकार कार्यक्रमासाठी शहरात यावेत यासाठी सुसज्ज असे नाट्यगृह असावे अशी अनेक वर्षांची मागणी शहरातील नागरिकांची होती. या मागणीसाठी केंद्र शासनाकडून केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य या योजनेअंतर्गत आपल्या जिल्ह्याचे दबंग खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करून निधी मंजूर करून घेतला असून यासाठीची निविदा प्रक्रिया नगरपालिकेमार्फत सुरू करण्यात आली असून दिनांक १९ मार्चपर्यंत टेंडर प्रक्रिया पार पडणार असून लवकरच नाट्यगृहाचे काम सुरू होणार आहे. यामुळे शहराच्या सौंदर्यात भर पडणार असून माजलगाव शहरात नाट्यगृह झाल्यानंतर अनेक कार्यक्रमाची पर्वणी नागरिकांसाठी उपलब्ध होणार आहे यासाठी माजलगाव मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद चंद्रजी पवार पक्षाचे नेते मोहनदादा जगताप साहेब यांनी खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्याकडे मागणी लावून धरली होती या मागणीचे दाखल घेऊन बजरंग बाप्पा यांनी यासाठी सातत्याने पाठपुरावा करून प्रश्न मार्गी लावला आहे त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाल्याची प्रतिक्रिया माजी नगरसेवक शरद यादव यांनी व्यक्त केली आहे तसेच अतिशय जिव्हाळ्याचा प्रश्न मार्गी लावल्याबद्दल खासदार बजरंग बाप्पा सोनवणे व मोहनराव जगताप यांचे माजलगाव शहरातील नागरिकांनी आभार मानले आहेत.





# शेतकऱ्यांनी ॲग्रिस्टॅक ओळख क्रमांकासाठी नोंदणी करावी -जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ

जालना । प्रतिनिधी

कृषि विभागाच्या शासन निर्णयान्वये राज्यात दि. १ डिसेंबर २०२४ रोजी पासुन अग्रिस्टॅक योजना राज्यात राबविण्यात येत आहे. त्यानुसार जिल्हयातील सर्व शेतकऱ्यांचा माहिती संच तयार करण्यात येत असुन शेतकऱ्यांना त्यांचा शेतकरी ओळख क्रमांक देण्याबाबतचे कामकाज करण्यात येत आहे. सद्यस्थितीत कॉमन सर्विस सेंटर/नागरी सुविधा सेवा केंद्रामार्फत शेतकऱ्यांची नोंदणी सुरु आहे. तरी शासनाच्या विविध योजनेचा लाभ वेळेवर मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी ॲग्रिस्टॅक ओळख क्रमांकासाठी नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

ॲग्रिस्टॅक योजनेमध्ये शेतकऱ्यांना अद्वितीय ओळख क्रमांक मिळतो. ज्यामध्ये त्यांचे आधार क्रमांक व जमिनीचा सातबारा याची माहिती समाविष्ट असते. या योजनेमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीसंदर्भात शेतात घेतलेली हंगामी पिके, त्यांचे भौगोलिक स्थान यांची एकत्र



पान ३ वर

# पहिल्या फेरीत १ हजार ५७८ विद्यार्थ्यांना मिळाले आरटीई अंतर्गत मोफत प्रवेश

## बोगस प्रवेशासंदर्भात सक्षम पुरावे तरीही शिक्षण विभागाकडून कारवाई नाही - मनोज जाधव

बीड । प्रतिनिधी

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेत सोडतीद्वारे प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची मुदत संपुष्टात आली. त्यानुसार, सोमवारी रात्रीपर्यंत जिल्ह्यात १ हजार ५७८ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. आता उर्वरित जागांवर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना संधी दिली जाणार आहे. अशी माहिती शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी दिली आहे.

राज्याच्या प्राथमिक शिक्षण संचालनालयातर्फे आरटीई प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे. यंदा जिल्ह्यात २१४ शाळांमध्ये २ हजार २३५ जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. त्यासाठी ५ हजार ७८१ अर्ज आले होते. प्रवेशासाठी काढलेल्या सोडतीद्वारे २ हजार १८३ विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चित झाले होते. त्यानंतर प्रवेशपात्र विद्यार्थ्यांसाठी प्रवेशफेरी सुरू करण्यात आली. मात्र, त्याला फारसा प्रतिसाद न मिळाल्याने १० मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. या मुदतीत १ हजार ५७८ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला आहेत. आता उर्वरित जागांवर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी दिली जाणार आहे.

बोगस प्रवेशा संदर्भात सक्षम पुरावे ; तरीही शिक्षण विभागाकडून कारवाई नाही - मनोज जाधव

सुरू असलेल्या आरटीई प्रवेश प्रक्रिये बाबत मनोज जाधव यांनी २७ फेब्रुवारी रोजी होत असलेल्या बोगस प्रवेशाबाबत रीतसर तक्रार दाखल केली होती. या तक्रारीवर शिक्षणाधिकारी यांनी २८ फेब्रुवारी रोजी गटशिक्षणाधिकाऱ्यांना दिलेल्या तक्रारीच्या संदर्भाने चौकशी समिती नेमून बोगस प्रवेशा संदर्भात चौकशी करण्याचे आदेश दिले होते. परंतु गटशिक्षणाधिकारी



पान ३ वर

# निश्चय नैसर्गिक रंगाच्या होळीचा; संकल्प वसुंधरेच्या रक्षणाचा

## ऊसतोड कामगार बालकांनसोबत होळी साजरी

घनसावंगी । प्रतिनिधी

होळी व धुलीवंदना निमित्त सर्वांनी पर्यावरण पूरक होळी साजरी करावी या उपक्रमाच्या अनुषंगाने जालना जिल्हातील पिंपरखेड या गावातील उसतोड कामगार पालक व बालका सोबत पर्यावरण पुरक होळी साजरी करण्यात आली आहे. यासाठी मराठवाडा ग्रामीण विकास संस्था छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने ही होळी साजरी करताना बाल कल्याण समिती अध्यक्ष एकनाथ राऊत,संस्थेचे अजय गाढे,शाळेचे मुख्याध्यापक शंकर मोरे,पालक विमल मिसाळ,प्रतिभा कराड,बळीराम कराड ,रामेश्वर नागरगोजे,आसाराम नागरगोजे, रामेश्वर बर्डे आदींची यावेळी उपस्थिती होती दरम्यान

सर्वांनी पर्यावरण स्नेही होळी साजरी करण्यात यावी या दृष्टीने या ऊसतोड कामगार बालकांनसोबत ही होळी साजरी करण्यात आली आहे.




# उद्या श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग ते श्री.क्षेत्र पैठण पायी दिंडीचे प्रस्थान

पिंपळवंडी । प्रतिनिधी

श्री.संत एकनाथ महाराज श्री एकनाथ षष्ठी पैठण प्रित्यर्थ प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री क्षेत्र अश्वत्थलिंग महादेव मंदिर ते श्री क्षेत्र पैठण पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन केले असून या दिंडीचे प्रस्थान उद्या दि.१५ मार्च २०२५ शनिवार रोजी होत असून या पायी दिंडी सोहळ्यात पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थान श्री.गंगाभारती मठाचे मठाधिपती महंत गुरुवर्य श्री.श्री.१००८ ह.भ.प.महादेवानंद भारती महाराज तसेच ह.भ.प.परमानंद भारती महाराज यांनी केले आहे.महंत महादेवानंद भारती महाराज यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनात भव्य पालखी रथातून दि.१५ मार्च शनिवार रोजी श्री क्षेत्र अश्वत्थलिंग महादेव मंदिरापासून सकाळी ८:३० वाजता भव्य पताके,टाळ मृदंगाच्या गजरात एकनाथ महाराजांच्या जयघोषात मोठ्या वारकऱ्यांच्या संख्येने प्रस्थान



**भाविकांनी दिंडी सोहळ्यात सहभागी व्हावे- महादेवानंद भारती महाराज**

पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
शुक्रवार, दि.१४ मार्च २०२५ । पान ७

# विद्येचं माहेरघर पुन्हा हादरलं!

## पुण्यात तरुणीवर अत्याचार, ओळखीचा गैरफायदा, सोशल मीडियातून धमक्या

**पुणे। प्रतिनिधी**

पुण्यात स्वारगेट बस डेपोमध्ये घडलेली २६ वर्षीय तरूणीवरील बलात्काराची घटना ताजी असतानाच आणखी एका घटनेनं पुणे हादरलं आहे. भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनच्या हद्दीत एका तरुणीवर बलात्काराची घटना घडली. ओळखीचा गैरफायदा घेत तरुणीवर बलात्कार केल्याची संतापजनक घटना घडली आहे. इतकच नव्हे तर तिला सोशल मीडियातून वारंवार धमकी दिली जात असल्याचा आरोप पीडित तरुणीने केला आहे. या प्रकरणी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनमध्ये आरोपी सिद्धांत रणधीर याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




मात्र वीस दिवसानंतरही त्याला अद्याप अटक करण्यात आली नाही अशी माहिती आहे. पीडित तरुणीला आरोपी सोशल मीडियाच्या माध्यमातून वारंवार धमकी देत आहे. तसेच तिच्या मोबाईल क्रमांकावर अश्लील फोटो सुद्धा आरोपीकडून पाठवण्यात आले आहेत. यावर पोलिसांनी लवकरात लवकर आरोपीला अटक केली जाईल आणि कठोर कारवाई केली जाईल असे म्हटले आहे. तर या घटनेने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे, अशा घटना वारंवार घडत असल्याने महिला, तरूणी यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिंहगड पोलीस स्टेशनमध्ये याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. बलात्काराचा गुन्हा दाखल करून तो आमच्याकडे वर्ग करण्यात आलेला आहे. २६ फेब्रुवारीला भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनला तो गुन्हा वर्ग करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास महिला पोलीस अधिकारी यांच्याकडे देण्यात आलेला आहे. पीडित तरुणीने दिलेल्या माहितीनुसार, संबंधित आरोपीच्या मोबाईलचे तांत्रिक विश्लेषण करून त्यावर त्याचा पुढील तपास सुरू केलेला आहे. आरोपीचा फोन बंद असल्यामुळे काही अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्याचा तांत्रिक तपास करून आम्ही आरोपी पर्यंत पोहोचू आणि आरोपीला लवकरात लवकर अटक करू असं पोलिसांनी सांगितलं आहे. तात्रिक तपासणीमध्ये काही अडचणी आल्यामुळे आरोपीपर्यंत पोहोचता आलेलं नाही. आम्हाला आणखी काही दुवे मिळाले आहेत. त्या आधारे आम्ही त्याला लवकरात लवकर अटक करू. तो तरुणीला धमक्या देत आहे, त्यानुसार कलमांमध्ये वाढ केलेली आहे आणि त्यामध्ये कारवाई देखील केली जाईल. या प्रकरणात कठोर कारवाई केली जाईल अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. आरोपीचा फोन बंद असल्यामुळे त्याला शोधण्यास अडचणी निर्माण झालेल्या आहेत, बाकी तांत्रिक तपास सुरू आहे त्यामुळे आम्ही निश्चितच लवकरच आरोपी पर्यंत पोहोचू, असं भारती विद्यापीठ पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सावळाराम साळगावकर यांनी सांगितलं आहे.

## निरा भिमा कारखान्याची निवडणूक बिनविरोध; हर्षवर्धन पाटील यांची सत्ता कायम

**इंदापूर । प्रतिनिधी**

इंदापूर तालुक्यातील शहाजीनगर येथील निरा भिमा सहकारी सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी अर्ज माघारीच्या अखेरच्या दिवशी २१ जागांसाठी २१ च अर्ज कायम राहिल्याने निवडणूक बिनविरोध झाली.



दरम्यान राज्याचे माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी कारखान्यावरील सत्ता कायम ठेवण्यात यश मिळवीत सलग ५ वी पंचवार्षिक निवडणुक पाटील यांच्या नेतृत्वाखाली बिनविरोध झाली आहे. यंदाच्या संचालक मंडळामध्ये विशेष बाब म्हणजे हर्षवर्धन पाटील यांच्यासह त्यांच्या पत्नी भाग्यश्री पाटील याही संचालक म्हणून विराजमान झाल्या आहेत.


माजी मंत्री हर्षवर्धन पाटील त्यांनी सन १९९९ मध्ये नीरा भीमा सहकारी साखर कारखान्याची स्थापना केली. त्यानंतर आज अखेर झालेल्या चारही निवडणुका हर्षवर्धन पाटील यांच्या नेतृत्वाखाली बिनविरोध झाल्या आहेत.

तर पाचव्या निवडणुकीमध्ये अर्ज माघारीच्या अखेरच्या दिवशी २१ जागांसाठी २१ अर्ज कायम राहिल्याने निवडणूक बिनविरोध झाली. या निवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी कल्याण पांढरे व त्यांना सहाय्यक म्हणून इंदापूरचे तहसीलदार जीवन बनसोडे यांनी काम पहिले.

## पुण्यातील नामांकित महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांची लुट? माहितीच्या अधिकारातून माहिती उघड, विद्यार्थी आक्रमक

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील नामांकित आयएसएस लॉ (खडड श्रु) महाविद्यालयाकडून अतिरिक्त फी उकळली जात आहे, असा आरोप विद्यार्थ्यांकडून केला जात आहे. महाविद्यालयाच्या विरोधात विद्यार्थ्यांकडून आंदोलन केलं जात आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी माहितीच्या अधिकारातून माहिती मागवली होती, त्या माध्यमातून धक्कादायक माहिती समोर आली होती. चार ते पाच हजार फी ऐवजी ४१ ते ४२ हजार रुपये फी घेतली जात आहे, त्यामुळे विद्यार्थी आक्रमक झाले आहेत. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी




आंदोलनात सहभाग घेतला तर कायदेशीर कारवाई करू, अशा नोटीस महाविद्यालयात लावून विद्यार्थ्यांवर दबाव टाकण्याचा प्रशासनाचा प्रयत्न असल्याचं विद्यार्थ्यांचं म्हणण आहे.

पुण्यातील नामांकित शिक्षण संस्था असणारी आयएसलॉ कॉलेज या शिक्षण संस्थेमध्ये अगदी माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, विलासराव देशमुख गोपीनाथ मुंडे यासह राज्यातील अनेक बड्या वकिलांनी शिक्षण घेतलं शिक्षण घेतलं. त्याच शिक्षण संस्थेमध्ये मोठा घोटाळा होत असल्याचा आरोप विद्यार्थ्यांकडून केला जात आहे. विद्यार्थ्यांनी माहितीच्या अधिकारातून मागवलेल्या माहितीनुसार, चार ते पाच हजार फी ऐवजी ४१ ते ४२ हजार रुपये फी घेतली जात आहे, त्यामुळे विद्यार्थी आक्रमक झाले आहेत. ज्या सुविधा विद्यार्थ्यांना मिळतच नाही, त्यातून हजारो टक्के नफा महाविद्यालय मिळवत असल्याचे समोर आले आहे.

महाविद्यालयाला शासनाकडून अनुदान मिळत असले तरी देखील महाविद्यालय इतक्या मोठ्या प्रमाणामध्ये विद्यार्थ्यांकडून लूट का करत आहेत? अशा प्रकारचा सवाल विद्यार्थ्यांनी केला आहे. तसेच यातून कमावलेला पैसा नेमका कुठे जातोय? हा देखील प्रश्न सध्या विद्यार्थ्यांसमोर पडला आहे. मात्र, विद्यार्थ्यांनी याला वाचा फोडण्यासाठी प्रयत्न केले तर विद्यार्थ्यांवर दबाव आणला जात असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.

## राजगुरुनगरमध्ये हिट अँन्ड रनची घटना; पोलिसांच्या भूमिकेवर सवाल

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील राजगुरूनगरमध्ये भीमाशंकर मार्गावर सातकरस्थळ येथे हिट अॅन्ड रनची घटना घडली. एका डॉक्टरने तीन दुचाकींसह पादचाऱ्यांना चिरडल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. ही अपघाताची घटना ११ मार्चला रात्रीच्या सुमारास घडली होती. या अपघातामध्ये ५ जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. कार चालवणारा चालक डॉक्टर असून तो दारुच्या नशेत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. या घटनेला २४ तास







उलटून गेल्यानंतरही पोलिसांनी गुन्हा दाखल केला नसल्याने पोलिसांच्या भूमिकेवर सवाल उपस्थित केला जात आहे.

११ मार्च रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली होती. कारचालकाने दुचाकीवरील तिघांना धडक दिली. याचसोबत इतर पादचाऱ्यांनाही धडक दिली आहे. एवढी मोठी अपघाताची घटना घडूनही पोलिसांना याबाबत काहीच माहित नव्हते. तसेच जखमी आणि मोटारचाकाबद्दल आम्हाला काही माहित नसल्याचेही पोलिसांनी सांगितले. या घटनेला २४ तास उलटूनही अद्यापर्यंत गुन्हा दाखल करण्यात न आल्याने अपराधाल्या पोलीस पाठीशी घालत आहेत का असा सवाल उपस्थित केला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कार चालकाने विविध ठिकाणी ९ जणांना धडक दिली आहे. कार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. या घटनेत तीन जणांच्या पायाची हाडे मोडली आहेत. त्यांची अवस्था गंभीर आहे. चासकडून राजगुरुनगरकडे येणाऱ्या एका कारने दुचाकीस्वारांना धडक दिली. यात दुचाकीवरील दोघेजण जखमी झाले. या घटनेनंतर वाहन चालकाने कार थांबवली नाही. तो पुढे निघून गेला. तीन पादचाऱ्यांना कारने धडक दिली. यामध्ये एकजण गंभीर जखमी आहे, तर दोघांना गंभीर दुखापत झाली आहे. या हिट अॅन्ड रनची चर्चा तालुक्यात होत केली जात आहे.

## मुंढवा परिसरातून १७ लाख रुपयांचा गांजा जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

मुंढवा परिसरात पोलिसांनी छापा टाकून सुमारे १७ लाख रुपयांचा २८ किलो गांजा जप्त केला. गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने ही कारवाई केली. अमली पदार्थ विरोधी पथक- दोनचे पोलिस निरीक्षक सुदर्शन गायकवाड, सहाय्यक पोलिस निरीक्षक नितीनकुमार नाईक आणि पोलिस अंमलदार आझाद पाटील यांना मुंढवा कोरेगांव पार्क रस्त्यावरील एका मोकळ्या प्लॉटमध्ये गांजा ठेवण्यात आल्याची माहिती मिळाली. त्यानुसार या पथकातील पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला.



प्रमोद सुधाकर कांबळे (वय-४४, रा. किल्ला वेस, करमाळा, सोलापूर), विशाल दत्ता पारखे (वय-४१, रा. मोहननगर, विश्रांतवाडी, पुणे) यांच्या ताब्यातून १६ लाख ८० हजार रुपये किमतीचा गांजा आणि इतर ऐवज जप्त करण्यात आला. या दोघांवर मुंढवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलिस आयुक्त शैलेश बलकवडे, पोलिस उपायुक्त निखिल पिंगळे, सहाय्यक आयुक्त राजेंद्र मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली अमली पदार्थ विरोधी पथक-२ चे पोलिस निरीक्षक सुदर्शन गायकवाड, सहाय्यक पोलिस निरीक्षक नितीनकुमार नाईक, पोलिस अंमलदार आझाद पाटील, मयूर सुर्यवंशी, संदीप जाधव, संदीप शेळके, योगेश मांढरे, युवराज कांबळे, चेतन गायकवाड, रवींद्र रोकडे, दिनेश बास्टेवाड, दिशा खेवलकर यांनी ही कारवाई केली.

## डोर्लेवाडीत तुकाराम बीज सोहळ्याची जोरदार तयारी



**बारामती । प्रतिनिधी**

बारामती तालुक्यातील डोर्लेवाडी येथे संत शिरोमणी श्रीतुकाराम महाराज बीज उत्सव मंडळ डोर्लेवाडी यांच्या वतीने तुकाराम बीज उत्सवाची तयारी जोरदार सुरू झाली आहे. यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहासह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

देहूनंतर डोर्लेवाडी गावात तुकाराम बीज उत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या उत्सवाचे यंदा ६६वे वर्ष आहे. यंदाचे वर्ष अमृतमहोत्सवी वर्ष म्हणून साजरे करण्यात येत आहे. तुकाराम बीज सोहळा दुपारी बारा वाजता असल्याने भाविकांचे उन्हापासून संरक्षण व्हावे यासाठी तुकाराम महाराज मंदिर परिसरामध्ये ५० हजार स्क्वेअर फुटांचा भव्य मंडप उभारण्याचे काम वेगात सुरू आहे. या सोहळ्यानिमित्त संत तुकाराम महाराज मंदिरामध्ये रविवारपासून (दि. ९) अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे. शनिवारी (दि. १५) दुपारी चार वाजता भव्य कुस्त्यांचा आखाडा होणार आहे. मंगळवारी (दि. १८) बैलगाडा शर्यती, रविवारी (दि. १६) सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. लक्ष्मण महाराज कोकाटे यांचे फुलाचे व काल्याचे कीर्तन होणार असून, ठीक दुपारी १२ वाजता पुष्पवृष्टी करून बीज सोहळा साजरा करण्यात येणार आहे.

## १ हजार ७६८ सायलेन्सरवर पोलिसांनी फिरवला बुलडोझर

**पुणे । प्रतिनिधी**

कर्णकर्कश आवाज काढणार्या सायलेन्सरचा वापर करणार्या बुलेटचालकांविरुद्ध वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. वाहतूक पोलिसांनी शहराच्या वेगवेगळ्या भागात बुलेटचालकांविरुद्ध कारवाई करुन फटाक्यांसारखे आवाज काढणारे सायलेन्सर जप्त केले. येरवड्यातील वाहतूक शाखेच्या कार्यालयात जप्त केलेल्या १ हजार ७६८ सायलेन्सरवर बुलडोझर चालविण्यात आला. येरवडा येथील वाहतूक विभागाच्या मैदानात ही कारवाई करण्यात आली.




रात्री अपरात्री शहर, तसेच उपनगरात भरधाव वेगाने बुलेटचालक तरूण जातात. बूलेटच्या सायलेन्सरमध्ये फेरफार (मॉडिफाय) करण्यात आल्याने त्यातून फटाक्यासारखा आवाज निघतो. या आवाजामुळे ज्येष्ठ नागरिकांना त्रास होत असल्याच्या तक्रारी करण्यात आल्या होत्या. गेल्या पंधरा ते वीस दिवसांपासून पोलिसांनी शहरातील वेगवेगळ्या भागात बुलेटचालकांविरुद्ध कारवाई करुन त्यांचे सायलेन्सर जप्त केले. कर्कश सायलेन्सर नष्ट करण्याचे आदेश पोलिस आयुक्त अमितेश कुमार, अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी दिले होते.त्यानंतर पोलिसांनी जप्त केलेल्या १ हजार ७६८ सायलेन्सरवर 'बुलडोझर' चालवून ते नष्ट केले. यावेळी अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे, पोलीस निरीक्षक सुनील गवळी आणि वाहतूक शाखेतील अधिकारी उपस्थित होते.

कर्णकर्कश सायलेन्सरचा वापर करणार्या दुचाकीस्वार, बुलेटचालकांविरुद्ध यापुढील काळात तीव्र कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलीस उपायुक्त अमोल झेडे यांनी दिला आहे. तसेच सायलेन्सर विक्री करणारे व्यावसायिक, तसेच सायलेन्सर बसवून देणारे गॅरेजचालकांविरुद्धही कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## दूध महागले! लिटरमागे २ रुपये दरवाढ जाहीर; १५ मार्चपासून नवे दर लागू

**कात्रज । प्रतिनिधी**

महागाईची झळ सर्वसामान्य जनतेला सगळीकडे बसत असतानाच आता जीवनावश्यक असणाऱ्या दुधाच्या दरातही २ रुपयांनी वाढ होणार आहे. दूध उत्पादक व प्रक्रिया कल्याणकारी संघाच्या सभासदांची बैठक पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, कात्रज डेअरीमध्ये घेण्यात आली.



संघाच्या मुख्यालयात सहकारी व खासगी दूध संघाची शिखर संस्था असलेल्या दूध उत्पादक व प्रक्रिया कल्याणकारी संघाची बैठक अध्यक्ष गोपाळराव म्हस्के यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यामध्ये हा दरवाढीचा निर्णय एकमताने घेण्यात आला. यावेळी विविध सहकारी व खाजगी दूध संघांचे ४७ प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

यावेळी पत्रकार परिषदेस चितळे दूध पेढीचे संचालक श्रीपाद चितळे, संगमनेर दूध संघाचे अध्यक्ष रणजितसिंह देशमुख आणि कात्रज दूध संघाचे अध्यक्ष स्वप्निल ढमढेरे, सहकारी व संघटनेचे अध्यक्ष गोपाळराव म्हस्के, मानद सचिव प्रकाश कुतवळ, उपस्थित होते.

या बैठकीमध्ये जिल्ह्यासह राज्यभर नकली पनीर व पनीर भेसळ रोखण्यासाठी जनजागृती, उपाययोजना करण्याबाबत चर्चा झाली. सध्या सगळीकडे पनीर म्हणून अनलॉगचीजची विक्री केली जात आहे, शेतकऱ्यांचे प्रलंबित असलेले अनुदान लवकरात लवकर देण्याबाबत शासनाकडे मागणी करण्याबाबत, अन्न व औषध विभाग, अन्न व औषध प्रशासन मंत्री/अधिकारी व दुग्धविकास मंत्री यांची भेट घेऊन भेसळखोरांवर कडक कारवाईची मागणी करण्याबाबतही चर्चा झाली.

यावेळी राज्यात दुधाचे संकलन आता सकाळ आणि संध्याकाळ असे दोनवेळा करण्याचा निर्णयही बैठकीत झाला. त्यामुळे गुणवत्तापूर्ण दुधाची उपलब्धता ग्राहकांना करणे शक्य होणार असल्याची माहिती कात्रज दूध संघाचे अध्यक्ष स्वप्निल ढमढेरे यांनी दिली.

## सतीश वाघ खून प्रकरणात मोठी अपडेट; काटा काढण्यापूर्वी जादूटोणा अन् रेकी, दोषारोप पत्रातून नवी माहिती

**पुणे । प्रतिनिधी**

विधानपरिषदेचे आमदार योगेश टिळेकर यांचे मामा सतिश तात्याबा वाघ यांचे अपहरण आणि हत्या या घटनेमुळे सर्वत्र मोठी खळबळ उडाली होती. या प्रकरणात वाघ यांची पत्नी मोहिनी वाघ हिने प्रियकर अक्षय जावळकर याला भरीस घालून वाघ यांची हत्या केली होती, अशी माहिती पोलीस तपासात समोर आली होती. आता वाघ यांचे अपहरण आणि हत्या प्रकरणात आणखी एक धक्कादायक माहिती समोर आली आहे.



सतीश यांचा काटा काढण्यासाठी जादूटोण्याचा प्रयोग केल्याचा धक्कादायक प्रकार आरोपपत्रातून समोर आला आहे. लष्कर न्यायालयात नुकतेच एक हजार पानांचे दोषारोपपत्र गुन्हे शाखेकडून दाखल करण्यात आले आहे. यातून ही माहिती समोर आली आहे. या दोषारोप पत्रात अक्षय आणि मोहिनीसह अतिश जाधव, पवन शर्मा, नवनाथ गुरसाळे आणि विकास शिंदे या सहा जणांवर आरोपपत्र दाखल झाले आहे.

सतीश यांना संपवण्यासाठी जवळपास एका वर्षापासून त्यांची पत्नी मोहिनी आणि तिचा प्रियकर अक्षय जवळकर हे प्लॅनिंग करत होते. यासाठी हे दोघे घरात भेटता येत नसल्याने एका लॉजवर भेटत असल्याची धक्कादायक माहिती देखील समोर आली आहे. सतीश यांचा खून करण्यापूर्वी मोहिनी हिने एका मांत्रिक महिलेची देखील वाघ मदत घेतली होती

आमदार योगेश टिळेकर यांचे मामा सतीश वाघ यांचे ९ डिसेंबर २०२४ रोजी अपहरण करून खून केल्याची धक्कादायक घटना घटना घडली होती. वाघ यांचा खून केल्यानंतर आरोपींनी त्यांचा मृतदेह उरळी कांचन येथील शिंदवणे घाटात फेकून दिला होता. या हायप्रोफाईल प्रकरणामुळे पुणे शहरासह राज्यभरात मोठी खळबळ उडाली होती. सतीश वाघ यांच्या मुलाने दिलेल्या फिर्यादीनुसार हडपसर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेचे गांभीर्य पाहता हे प्रकरण गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आले.